# ठाणे महानगरपालिका ठाणे

## सन २०१६-१७

## महापालिका आयुक्त श्री.संजीव जयस्वाल यांचे निवेदन

मा.स्थायी समिती सभापती व सन्माननीय सदस्य,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये मी ठाणे महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे मूळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

ठाणे शहर राज्यातील अत्यंत झपाटयाने वाढणारे शहर असून मुंबईलगत असल्याने ते डॉरमेटरी शहर म्हणून गणले जात आहे. लोकसंख्या वाढीचा वेग व शहराचे नागरीकरण पाहता शहराच्या पायाभूत सुविधांवर ताण वाढत चाललेला आहे. स्मार्ट सिटीकडे वाटचाल करतांना ठाणेकरांच्या अपेक्षाही मोठया प्रमाणात वाढलेल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक एक अत्यंत महत्वाचा घटक असून त्या माध्यमातून लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अंदाजपत्रक वास्तववादी, संरचनात्मकदृष्टया परिपूर्ण, लेखा सिद्धांतानुसार वर्गीकरण व परिणामलक्षी असणे हे अत्यंत महत्वाचे आहे.अंदाजपत्रकात दीर्घ वा मध्यम मुदतीचे नियोजन व पारदर्शक माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय प्रथमच भांडवली कामांच्या यादयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

ठाणे शहरातील वाढत्या समस्या व पायाभूत सुविधेवरचा ताण विचारात घेता त्यावर मात करुन उपाययोजना करण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. यादृष्टीने फक्त महानगरपालिका

निधी किंवा शासकीय अनुदाने यांचा सीमित विचार न करता पीपीपी, संयुक्त प्रकल्प, सीएसआर निधी इत्यादी मार्गांचाही अवलंब करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. चालू आर्थिक वर्ष व आगामी अर्थसंकल्पीय वर्षामध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे सुरु करावी लागणार असल्याने या विकास कामांची अंमलबजावणी करतांना शहरातील सर्व घटकांचे सक्रीय, सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे.

सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प तयार करताना उत्पन्नाच्या अतिशय सूक्ष्म बाबींचा विचार करुन प्रत्यक्ष प्राप्त होणा-या उत्पन्नाचाच विचार करुन कोणतीही अवाजवी वाढ न करता उत्पन्न व खर्चाचा अंदाज करण्यात आला होता व त्याचा परिणाम म्हणून अंदाजित केलेले उत्पन्न प्रत्यक्षात प्राप्त होण्याची चिन्हे आजच्या वसुलीच्या आकडेवारीवरुन दिसत आहे.

ठाणे महापालिकेच्या इतिहासात प्रथमच सन २०१६-१७ चा अर्थसंकल्प **रु.२३०.१० कोटी** आरंभीच्या महसुली उत्पन्नाच्या शिल्लकेसह सुरुवात होत आहे. त्यामुळे महापालिकेचा अर्थसंकल्प हा **रु.२३०.१० कोटीने** वाढून तो **रु.२५४९.८२ कोटी** इतका प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१५-१६ च्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेऊन **रु.१९९८ कोटीचा** अर्थसंकल्प तयार केलेला होता. मा. स्थायी समितीने त्यामध्ये **रु.४३५ कोटीची** वाढ प्रस्तावित करुन **रु.२४३३** कोटीचा अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर केला. मा. महासभेने स्थायी समितीने शिफारस केलेला अर्थसंकल्प रु.**६३ कोटी** कमी करुन तो **रु.२३७० कोटी** इतका अंतिम केला.

ठाणे महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न व दायित्व पहाता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान असून महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देऊन ते पूर्ण करावे लागणार आहे. सन २०१५-१६ मध्ये महसुलाच्या वसुलीत वाढ करुन कमीत कमी दायित्व पुढील वर्षी हस्तांतरित केल्याने सन २०१६-१७ मध्ये नवीन नागरी सुविधांच्या कामासाठी तरतूद करणे शक्य झाले आहे. सन २०१६-१७

चा अर्थसंकल्प तयार करताना संपूर्ण विभागांचा कामनिहाय आढावा, प्रलंबित दायित्व यांचा सविस्तर विचार करण्यात आलेला असून त्यानुसार पुढील वर्षी नवीन कामांसाठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

उत्पन्नाचे अल्प स्त्रोत विचारात घेऊन यापूर्वी पीपीपीच्या माध्यमातून घेण्यात आलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच मोठे प्रकल्प हे Construction TDR च्या माध्यमातून विकासकामार्फत करुन घेण्याचे नियोजन आहे. सन २०१६-१७ या आगामी वर्षात रस्ते विकास, वाहतूक नियोजन, आरोग्य, तलाव संवर्धन या विषयावर विशेष भर देण्यात येणार आहे. ठाणे शहराच्या सुनियोजित विकासाबाबत मी कटिबध्द आहे.

यापुढे सन २०१५-१६ च्या सुधारित व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजाबाबत मी सविस्तर भाष्य करणार आहे.

## सन २०१५-१६ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज

**(रकमा कोटीत)**

| अनु. | तपशील | सन २०१५-१६ चे मूळ अंदाज | सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| १ | **महापालिका उत्पन्न** | २०३८.०० | १८९६.२५ |
| २ | **अनुदाने** | २४३.०० | २१६.०४ |
| ३ | **कर्ज** | ८८.७६ | ८४.०२ |
| ४ | **आरंभीची शिल्लक** | ०.२४ | ६२.९७ |
| | **एकूण जमा** | **२३७०.००** | **२२५९.२८** |
| | | | |
| १ | **महसुली खर्च** | ११७१.८० | १०६२.३५ |
| २ | **भांडवली खर्च (अ व क अंदाज)** | ९२१.४६ | ७४५.०८ |
| ३ | **भांडवली खर्च (जेएनएनयुआरएम)** | २७६.५४ | २२१.७५ |
| ४ | **अखेरची शिल्लक** | ०.२० | २३०.१० |
| | **एकूण खर्च** | **२३७०.००** | **२२५९.२८** |

# सन २०१६-१७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

**(रकमा कोटीत)**

| अ.क्र. | तपशील | सन २०१६-१७ चे मूळ अंदाज |
|---|---|---|
| १ | **महापालिका उत्पन्न** | **२०८६.००** |
| २ | **अनुदाने** | **१७९.८६** |
| ३ | **कर्ज** | **५३.८६** |
| ४ | **आरंभीची शिल्लक** | **२३०.१०** |
| | **एकूण जमा** | **२५४९.८२** |
| | | |
| १ | **महसुली खर्च** | **१२५१.१८** |
| २ | **भांडवली खर्च (अ व क अंदाज)** | **१००१.२८** |
| ३ | **भांडवली खर्च (जेएनएनयुआरएम)** | **२९७.२१** |
| ४ | **अखेरची शिल्लक** | **०.१५** |
| | **एकूण खर्च** | **२५४९.८२** |

# महानगरपालिका उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत

## १. स्थानिक संस्था कर :

स्थानिक संस्थाकरापोटी सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकात **रु.७५० कोटी** उद्दिष्ट अपेक्षित करण्यात आले होते. परंतु राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ पासून रु.५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापा-यांना स्थानिक संस्था करातून सूट दिल्याने सन २०१५-१६ मध्ये **रु.६४६ कोटी** इतकी सुधारित जमा अपेक्षित करण्यात आली आहे.

शासन अनुदानाच्या अपेक्षित रकमांचा अंदाज करुन सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात स्थानिक संस्था करापासून **रु.७०० कोटी** उत्पन्न अपेक्षित आहे.

**२. मालमत्ता कर :**

मालमत्ता कर , फी व शासकीय करासह सन २०१५-१६ मध्ये **रु.४०० कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. परंतु जानेवारी २०१५ पर्यंत प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्नाचा विचार करता मालमत्ता करापासून **रु.३९० कोटी** सुधारित जमा अपेक्षित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी सामान्यकरामध्ये वाढ करणे आवश्यक होते. परंतु ब-याच वर्षापासून सामान्य करात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे **निवासी** मालमत्तांच्या सामान्यकरात **२६** टक्क्यावरुन **३६** टक्क्यानी वाढ व **बिगर निवासी** मालमत्तांच्या सामान्यकरात **३८.५०** टक्क्यावरुन **४८.५०** टक्के वाढ प्रस्तावित करण्यात येत असून ही वाढ केल्यामुळे रु.३१ कोटी वाढीव उत्पन्न मिळणार असल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता कर , फी व शासकीय करासह पासून **रु.४५६ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**३. विकास व तत्सम शुल्क :**

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात शहर विकास विभागाकडून विकास आकार व तत्सम शुल्कापोटी महापालिका आयुक्त यांनी रु.३५० कोटी उत्पन्न प्रस्तावित केले होते. परंतु मा. महासभेने त्यामध्ये रु.१९७ कोटीची वाढ करुन रु.५४७ कोटी अपेक्षित केले होते. जानेवारी २०१६ पर्यंतच्या प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्नाचा विचार करता विकास आकार व तत्सम शुल्कापासून **रु.४६० कोटी** सुधारित उत्पन्न अपेक्षित केले आहे.

शहर विकास विभागामधून विकास आकार व तत्सम शुल्कापासून सन २०१६-१७ या वर्षासाठी **रु.५१५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**४.पाणी पुरवठा आकार :**

पाणी पुरवठा आकारापासून सन २०१५-१६ मध्ये रु.१४५ कोटी उत्पन्न अपेक्षित करण्यात आले होते ते सुधारित करुन **रु.१३५ कोटी** करण्यात आले आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी पाणी पुरवठा आकारापासून **रु.१५० कोटी** उत्पन्न प्रस्तावित केले आहे.

### ५. अग्निशमन फी व आकार :

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु.७०.१४ कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते परंतु जानेवारी २०१६ च्या प्रत्यक्ष प्राप्त रकमा पहाता ते सुधारित करुन **रु.६५ कोटी** करण्यात येत आहे.

सन २०१६-१७ साठी अग्निशमन विभागाकडून **रु.७९ कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेले आहे.

### ६.रस्ता खोदाई फी :

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत रस्ता खोदाई फी पासून रु.५५ कोटी उत्पन्न अपेक्षित केलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त होणार असल्याने ते सुधारित करुन **रु.१२५ कोटी** अपेक्षित धरण्यात आले आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रस्ता खोदाई फी पासून **रु.९९.५० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

### ७. जाहिरात कर :

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जाहिरात करापोटी अंदाजित केलेले **रु.१६ कोटी** सुधारित करुन **रु.१४ कोटी** करण्यात येत आहे.

जाहिरात करापासून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१७.५० कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

### ८. घनकचरा सेवा शुल्क :

केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम अंतर्गत विविध प्रकल्पांना मान्यता देताना सुधारणा (Reforms) कार्यक्रम राबविण्याची अट घालण्यात आली होती. त्यानुसार घनकचरा सेवाशुल्क आकारणे क्रमप्राप्त झाले आहे. सदर सेवाशुल्क आकारणी पोटी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात घनकचरा विभागाकडून रु.१९.७२ कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.२.०० कोटी** करण्यात येत असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात घनकचरा सेवा शुल्कापासून **रु.१९.९९ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**९. स्थावर मालमत्ता भाडे व शुल्क :**

महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तांपासून अपेक्षित केलेले **रु.१२.२० कोटी** उत्पन्न प्राप्त होणार नसल्याने ते सुधारित करुन **रु.५.०० कोटी** करण्यात येत असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.१०.०० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**१०. परवाना विभाग :**

परवाना शुल्क, नुतनीकरण शुल्क, विलंब शुल्क यापासून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रु.१.३० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.१.२५ कोटी** करण्यात येत असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात परवाना व इतर शुल्कापासून **रु.१.२५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेले आहे.

**११. अतिक्रमण नियंत्रण आकार :**

अतिक्रमण नियंत्रण विभागाकडून रु.६.९० कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.२ कोटी** करण्यात येत असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.५कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेले आहे.

**१२. आरोग्य विभाग :**

सन २०१५-१६ या वर्षासाठी रु.१.३१ कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते ते सुधारित करुन **रु.२.२५ कोटी** प्रस्तावित करण्यात येत असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.१.५० कोटी** उत्पन्न अपेक्षित करण्यात आले आहे.

**१३. अनुदाने :**

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये रु.२४३ कोटी अनुदान अपेक्षित होते. परंतु आतापर्यंत प्रत्यक्षात प्राप्त अनुदानाचा विचार करता ते सुधारित करुन **रु.२१६.०४ कोटी** अपेक्षित धरण्यात आले आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु. १७९.८६ कोटी** केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

**१४. कर्जे :**

सन २०१५-१६ मध्ये कर्ज घेण्याची शक्यता कमी असल्यामुळे मूळ अंदाजपत्रकात असलेली रु.८८.७६ कोटी तरतूद कमी करुन **रु.८४.०२ कोटी** इतकी सुधारित करण्यांत येत आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.५३.८६ कोटी कर्ज** घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अशाप्रकारे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे **रु.२२५९.२८ कोटीचे सुधारित** व सन २०१६-१७ चे **रु.२५४९.८२ कोटीच्या मूळ** जमेचे अंदाज स्थायी समितीस सादर करीत आहे.

## विभाग निहाय महसुली उत्पन्नाचे विवरणपत्र

**(रकमा कोटीत)**

| अ.क्र. | विभाग | सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन २०१६-१७ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कर व जकात | ६४६.०० | ७००.०० |
| २ | शहर विकास विभाग | ४६०.०० | ५१५.०० |
| ३ | मालमत्ता कर | ३५८.०० | ४१६.०० |
| ४ | पाणी पुरवठा विभाग | १३८.०४ | १५३.३३ |
| ५ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १३५.६५ | १००.०० |
| ६ | अग्निशमन दल | ६५.०० | ७९.०० |
| ७ | जाहिरात विभाग | १४.०० | १७.५० |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन विभाग | २.०० | १९.९९ |
| ९ | स्थावर मालमत्ता विभाग | ५.०० | १०.०० |
| १० | आरोग्य | ७.७० | ७.१६ |

| अ.क्र. | विभाग | सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन २०१६-१७ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|
| ११ | परवाना विभाग | १.२५ | १.२५ |
| १२ | अतिक्रमण विभाग | २.०० | ५.०० |
| १३ | मनोरंजन व क्रीडा | ४.८५ | ५.२१ |
| १४ | शिक्षण | २.०१ | १.९० |
| १५ | अन्य विभाग | १४.७५ | १४.६६ |
| | **एकूण** | **१८५६.२५** | **२०४६.००** |

## विभाग निहाय महसुली खर्चाचे विवरणपत्र

(रकमा कोटीत)

| अ.क्र. | विभाग | सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन २०१६-१७ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ६१४.६३ | ७४२.१४ |
| २ | पाणी पुरवठा विभाग | २२५.७८ | २५५.९८ |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन विभाग | १७०.१० | २१८.३३ |
| ४ | स्मार्ट सिटी, अमृत व जेएनएनयुआरएम | २२१.७५ | २९७.२१ |
| ५ | विदयुत विभाग | ५५.५६ | ९८.५५ |
| ६ | उदयान व वृक्षप्राधिकरण | २८.२७ | ५२.८७ |
| ७ | आरोग्य विभाग | ७०.८० | ८३.७१ |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय | ४७.२२ | ७८.८४ |

| अ.क्र. | विभाग | सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन २०१६-१७ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|
| ९ | शिक्षण विभाग | १८७.८९ | २०२.१६ |
| १० | मलनिःसारण विभाग | ४९.८२ | ५७.९५ |
| ११ | अग्निशमन दल | २३.५७ | ४६.०२ |
| १२ | समाज विकास विभाग | १९.१९ | ३०.४५ |
| १३ | परिवहन सेवा | ५२.५० | ७०.०० |
| १४ | अन्य विभाग | २६२.११ | ३१५.४५ |
| | **एकूण** | **२०२९.१८** | **२५४९.६७** |

## महसुली व भांडवली खर्च

### (१) सार्वजनिक बांधकाम विभाग

### (अ) पूल प्रकल्प

### सन २०१५-१६ मध्ये सुरु असलेले व पूर्ण झालेले प्रकल्प

● एल.बी.एस. रोडवर रहेजा कॉम्प्लेक्स व वागळे इस्टेट मेन रोडवर एम.आय.डी.सी. ऑफिस जवळ पादचारी पूल बांधण्यांत येत असून तो मे २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

● पुर्व द्रुतगती महामार्गावर आनंदनगर येथील पादचारी पुलाचे काम पूर्ण झाले असून ज्युपिटर हॉस्पीटल जवळ व घोडबंदर रस्त्यावर तत्वज्ञान विद्यापीठ, आर-मॉल, ब्रम्हांड जंक्शन, हायपरसिटी मॉल येथील एकूण ५ ठिकाणी पादचारी पूल बांधण्यात येत आहेत. त्याचे काम डिसेंबर २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

●कळवा खाडीवर पूल बांधण्याचे काम सुरु करण्यात आले असून सदर कामाची मुदत ३६ महिन्यांची असल्याने तो विहित वेळेत पूर्ण करण्यात येईल.

● स्टेशन परिसर वाहतूक सुधारणा योजनेअंतर्गत (सॅटीस) बांधण्यात आलेल्या डेकवर अत्याधुनिक पध्दतीचे सुमारे २५०० चौ.मी.क्षेत्राचे छत उभारण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

●कळवा पूलावरुन राबोडीकडे जाणा-या रस्त्यावर आकाशगंगा सोसायटीजवळ पुलाचे काम पूर्ण झालेले असून त्याचा वापर सुरु करण्यात आला आहे.

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### ● ठाणे घोडबंदर रस्त्यावर पाच ठिकाणी पादचारी पूल बांधणे

घोडबंदर रस्त्यावर होणारी वाहतूक पाहता डोंगरीपाडा, मुच्छला पॉलीटेक्नीक, ओवळा, भाईंदरपाडा, गायमुख घाट येथे पादचारी पूल बांधण्याचे काम जाहिरातीचे हक्क देऊन बीओटी तत्वावर करण्याचे नियोजन असून या निविदेस प्रतिसाद न मिळाल्यास सदर पादचारी पूल महापालिकेच्या निधी मधून बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामाचा खर्च अंदाजे रु.३३.२७ कोटी इतका असून सन २०१६-१७ साठी चालू असलेल्या पादचारी पुलाच्या खर्चासह **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

### ● सॉफ्ट मोबीलिटी नेटवर्क विकास

पोखरण रोड नं. १, उपवन, पोखरण रोड नं. २, वसंतविहार, पवार नगर व टिकुजीनीवाडी रोडवर सॉफ्ट मोबिलिटी प्रकल्प राबविण्यात येणार असून या प्रकल्पामध्ये इलेक्ट्रीसिटीवर चालणा-या वाहनांचा वापर करण्यासाठी स्वतंत्र मार्गिका करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आहे.

# (ब) रस्ते प्रकल्प

## सन २०१६-१७ मधील प्रस्तावित प्रकल्प

### १. नवीन मॉडेल रस्ते विकसित करणे

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये मोठया प्रमाणात रस्त्याचे जाळे विखुरलेले असून आजपर्यंत डांबरीकरणाद्वारे यु.टी.डब्ल्यु. टी पध्दतीने व सिमेंट कॉंक्रीटीकरणाद्वारे रस्त्याचा विकास करण्यात आलेला आहे इतर शहरांचा विचार करता ठाणे महानगरपालिकेने बांधलेले रस्त्याचे Carriage Way चांगले आहेत. तथापि, बाजूला असलेले साईड शोल्डर, फुटपाथ चांगल्या स्थितीत नसून तेथे अनधिकृत पार्कींग, अनधिकृत फेरीवाले व इतर कारणामुळे वाहनांना व पादचा-यांना त्रास होत आहे. तसेच Carriage Way च्या बाजूला मोठे खड्डे पडलेले असल्याने अपघात होण्याची शक्यता असते.

त्यासाठी २०१६-१७ या आर्थिक वर्षात वाहतूक सुरळीत होण्यावर व पादचा-यांना सुविधा देण्यासाठी नवीन १० रस्ते मॉडेल रस्ते म्हणून प्रायोगिक तत्वावर विकसीत करण्याचा मानस आहे. मॉडेल रस्त्यांमध्ये सध्यस्थितीत Carriage Way सह बाजूला असणा-या साईड शोल्डर व पदपथांचे सौंदर्यीकरणासह विकसित करण्यात येणार असून या रस्त्यावर असणारे बसथांबे, डीपी व एमटीएनलचे बॉक्स, सुव्यवस्थितपणे स्थलांतरित करण्यात येणार आहेत. तसेच पादचा-यांना सुरळीत व सुरक्षित चालता यावे यासाठी मार्किग पेटींग, दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही कॅमेरे, वाय-फाय सुविधा, यांत्रिकी पध्दतीने साफसफाई, रस्त्यावर कचरा व अनधिकृत पार्किग होऊ नये यासाठी मार्शलची नेमणूक करणेचे प्रयोजन आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील अस्तित्वातील चौकामध्ये पावसाळयात खड्डे पडून होणारी वाहतूकीची कोंडी, अपघात टाळण्यासाठी मागील दोन वर्षात मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने चौकांचे पुनर्पृष्ठीकरण व मजबुतीकरण करण्याचा कार्यक्रम घेण्यात आलेला असून त्या अंतर्गत आतापर्यंत ४० चौकांचे मजबुतीकरण करण्यात आले असून सन २०१६-१७ मध्ये एकूण २३ चौकांचे मजबुतीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. फुटपाथलगत व डिवायडरमध्ये शोभिवंत झाडांच्या माध्यमातून सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात एकूण १० मॉडेल रस्ते तयार करण्यासाठी **रु.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## २. रस्ता रुंदीकरण व नुतनीकरण

ठाणे शहराची वाढती लोकसंख्या, वाहनसंख्या व त्यामुळे होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी, विकास आराखडयातील नियोजनाप्रमाणे अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरण करणे क्रमप्राप्त झ ालेले आहे. भविष्यकालीन वाहतुकीचा विचार करुन सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १२.१९ किलोमीटरचे १६ रस्ते रुंदीकरण करुन नुतनीकरण करण्याचे प्रयोजन आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात **रु.१२५ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २०१६-१७ मध्ये विकास आराखडयातील ५.९ किलोमीटर लांबीचे एकूण २ रस्ते विकसित करण्यासाठी **रु.४० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

विकास आराखडयातील २.२३ किलोमीटर लांबीचे मिसिंक लिंक जोडण्यासाठी या आर्थिक वर्षात **रु.२५ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

## ३. यु.टी.डब्ल्यु.टी. व सिमेंट कॉंक्रीटीकरण

रस्त्यांचे यु.टी.ड.ब्ल्यु.टी. व सिमेंट कॉंक्रीटीकरण पध्दतीने १६ किलोमीटरचे लांबीचे २१ रस्ते विकसित करण्याचे नियोजन असून त्यासाठी यु.टी.डब्ल्यु.टी. रस्त्यासाठी **रु.५० कोटी** व सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्यांसाठी **रु.१२ कोटी** तरतूद सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

## ४. कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून रस्ता रुंदीकरण

ठाणे शहराची वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाहतुकीमध्ये झालेली वाढ पाहता नवीन विकसित होणा-या भागासाठी रस्त्याचे रुंदीकरण करणे क्रमप्राप्त झालेले असल्याने यावर्षी रस्ते विकास व एकात्मिक रस्ता रुंदीकरण हाती घेण्याचा मानस आहे. त्यानुसार सन २०१६-१७ मध्ये खालील रस्ते विकसित करण्याचे प्रयोजन आहे.

त्यापैकी कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून खाली नमूद रस्ते विकसित करण्याचे प्रयोजन आहे.

१. ४० मीटर रुंदीचा घोडबंदर रोडवरील वेदांत हॉस्पिटल ते विंहग व्हॅली कॉम्प्लेक्स रस्ता
२. ४० मीटर रुंदीचा भाईंदरपाडा येथील ट्रक टर्मिनस आरक्षण ते घोडबंदर रस्ता
३. ३० मीटर रुंदीचा आनंदनगर खेळाचे मैदान आरक्षण ते घोडबंदर रस्ता
४.३० मीटर रुंदीचा मार्केट आरक्षण क्र.२पासून पोस्ट ऑफीस ते पार्कवुड कॉम्प्लेक्स रस्ता
५.३० मीटर रुंदीचा होरायझन स्कूल ते विजय रेसिडेन्सीमार्गे राणी खन्ना स्कूल
६.४० मीटर रुंदीचा वाघबीळ रोड ते हिरानंदानी इस्टेट रस्ता
७. तुर्फेपाडा रोड

**• महापालिका निधीतून पुढील रस्ते विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.**

१. २४ मीटर रुंदीचा शीळ-दिवा रस्ता
२. ३० मीटर रुंदीचा दिवा-आगासन-देसाई-खर्डी रस्ता
३. ४० मीटर रुंद ग्लॅडी अल्वारीस रोड कोठारी गोडाऊन ते निळकंठ वुडस ते घोडबंदर रस्ता
४. आर मॉल येथून मनोरमानगर ते कोलशेत रस्ता
५. बुधाजीनगर रस्ता

**• विकास आराखडयानुसार रस्ते रुंदीकरणाअंतर्गत महापालिका निधीतून खालील रस्ते विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.**

१. पोखरण रस्ता क्र. १
२. पोखरण रस्ता क्र. २
३. कापुरबावडी नाका ते बाळकुम
४. कळवा नाका ते मनिषानगर

५. सुभाष पथ
६. शिवाजी पथ
७. महात्मा गांधी रोड
८. खोपट रोड
९. राघोबा शंकर पथ
१०. एल.बी.एस. रोड

## (क ) भवन प्रकल्प

## सन २०१५-१६ मध्ये पूर्ण झालेले व सुरु असलेले प्रकल्प

### १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना

महापालिकेमध्ये २५ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्ती नंतर किंवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी भाईंदर पाडा व साकेत येथे अनुक्रमे २३४ व ५६ अशा एकूण २९० सदनिका बांधण्यात आल्या असून २७४ सफाई कामगारांना सोडत प्रक्रियेद्वारे सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहेत.

### २. हिंदुह्दयसम्राट शिवसेनाप्रमुख मा.बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधकाम (प्रथम टप्पा व द्वितीय टप्पा.

हिंदुह्दयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचे काम सुरु असून प्रथम टप्प्यात **रु.८.४६ कोटी** तरतूद केलेली असून दुस-या टप्प्यासाठी सन २०१६-१७ साली **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३. बाळकुम तरण तलाव

बाळकुम परिसरातील ध्रुव वूलन मिल कंपनीच्या जागेतील सुविधा भूखंडावर ऑलिम्पिक साईजचा तरण तलाव बांधण्यास महासभेने मंजुरी दिलेली असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक

वर्षात **रू.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. सदरचा तरण तलाव पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### ४. क्रीडासंकुल उभारणी

कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात मेंटल हॉस्पीटल जवळ एसीसी कंपनीच्या सुविधा भूखंडावर तळ अधिक दोन मजल्याचे मिनी क्रीडा संकुल बांधण्याची प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ५. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक

ठाणे शहरामध्ये थोर साहित्य सम्राट लोकशाहीर, अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक बांधीव सुविधेमार्फत बांधण्यात येईल. बांधीव सुविधेमधून शक्य नसल्यास महानगरपालिका निधीमधून बांधण्यात येईल.

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### १. वर्तकनगर येथे मिनी-मॉलचे बांधकाम

पोखरण रोड नं १ च्या रूंदीकरणातील व्यावसायिक गाळेधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी व त्या भागात पार्किंग सुविधा निर्माण करण्यासाठी वर्तकनगर नाक्यावर म्हाडाने महापालिकेला ताब्यात दिलेल्या भूखंडावर पीपीपीच्या माध्यमातून मिनीमॉल निर्माण करण्याचे प्रस्तावित असून पीपीपी तत्वावर प्रतिसाद न मिळाल्यास महापालिका निधीतून मिनीमॉल बांधण्याचे नियोजन असून सन २०१६-१७ मध्ये **रू.५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर इमारती मधील तळघरात २५० दुचाकी वाहनांची पार्किंग प्रस्तावित आहे. ज्यामुळे परिसरातील रस्त्यावरील पार्किंग समस्या कमी होऊ शकेल.

### २. एम.एम.आर.डी.ए कडून व्यावसायिक दुकाने खरेदी

एमएमआरडीए रेंटल योजनेमधील वाणिज्य गाळे खरेदी करुन रस्ते रुंदीकरणामध्ये बाधीत होणा-या विस्थापितांना देण्याचे प्रस्तावित

असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३. कृत्रिम प्रस्तरारोहण (Artificial Climbing Wall)

तीनहात नाका येथील एसीसी कंपनीच्या सुविधा भूखंडावर जागतिक स्तरावरील क्लायबिंग वॉल्सचे बांधकाम सीएसआर निधीतून करण्याचे प्रस्तावित असून त्यामधून प्रतिसाद न मिळाल्यास सदरचे काम महापालिका निधीतून करण्याचे नियोजन असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ४. इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट (जेटी सुविधा)

ठाणे शहरास लाभलेल्या ३२ कि.मी. खाडी परिसरातील कोलशेत, कोपरी व पारसिक रेतीबंदर येथे प्रथम टप्प्यात जेटी निर्माण करण्याचा विचार असून शहरांतर्गत जलवाहतूक करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्प बीओटी किंवा पीपीपी तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. बीओटी किंवा पीपीपी तत्वावर प्रतिसाद न मिळाल्यास महापालिका निधीतून हे काम करण्याचे नियोजन असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ५. गडकरी रंगायतन नुतनीकरण व विद्युतीकरण

ठाणे शहरातील सांस्कृतिक वास्तू असलेल्या गडकरी रंगायतनाचे नुतनीकरण व विद्युतीकरण करणे आवश्यक असून त्यासाठी **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ६. प्रभाग कार्यालय बांधणे

मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र मोठे असून सध्या अस्तित्वात असलेले प्रभाग कार्यालय धोकादायक असल्याने त्याची तात्पुरती व्यवस्था मुंब्रा येथील बी.एस.यु.पी. प्रकल्पामध्ये करण्यात येणार आहे. मुंब्रा विभागासाठी कायमस्वरुपी अद्ययावत असे प्रभाग कार्यालय बांधणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वागळे प्रभाग समितीच्या कार्यालयासाठी नविन फर्निचरव अनुषंगिक व्यवस्था करण्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ७. टीएमटी डेपोंचा विकास

ठाणे परिवहन सेवेसाठी भांडवली खर्च महानगरपालिकेने करणे आवश्यक असल्याने सध्या ओवळा व मुल्लाबाग येथे डेपो विकसित करण्याचे काम सुरु असून भविष्यात येणा-या बसेससाठी त्याचा उपयोग होणार आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मुल्लाबाग डेपोसाठी **रु.२.८० कोटी** व ओवळा डेपोसाठी **रु.९.२५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## (ड) पर्यावरण संवर्धन प्रकल्प

### सन २०१५-१६ मध्ये पूर्ण झालेले व सुरु असलेले प्रकल्प

**१. एकात्मिक तलाव सौंदर्यीकरण कार्यक्रम**

ठाणे शहर तलावांचे शहर असून यामध्ये एकूण ३५ तलावांचा समावेश असून सन २०१५-१६ मध्ये कळवा येथील शिवाजीनगर, कोपरीतील हरिओमनगर या दोन तलावांची कामे पूर्ण करण्यात आली असून ब्रम्हाळा व कचराळी तलावाच्या सौंदर्यीकरणाचे काम मार्च २०१६ पूर्वी पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

**२. तलाव संवर्धन**

मासुंदा तलाव, जेल तलाव व उपवन तलावाचे संवर्धन करण्याचे प्रस्तावित असून ही कामे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे.

### सन २०१६-१७ मधील प्रस्तावित प्रकल्प

**१. वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट**

ठाणे शहरास लाभलेल्या ३२ किमी खाडी परिसरापैकी प्रथम टप्प्यातील सिडको बस स्टॉप ते साकेत या ३.४ किमी लांबीच्या खाडीपरिसराचे सुशोभिकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असून या प्रकल्पाचा स्मार्ट सिटी अभियानात समावेश करण्यात आला असून त्यासाठी रु.२२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प पीपीपी किंवा बीओटी माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**२. कमल तलाव**

कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातील कलम तलावाचे सुशोभिकरणासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**३. मासुंदा तलाव येथे एलईडी सुशोभिकरण**

मासुंदा तलावाचे सुशोभिकरणाअंतर्गत LED पथदिवे लावण्यात येणार असून त्याकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**४. उपवन तलाव म्युझिकल फाऊंटन**

उपवन तलावाचे सुशोभिकरणाअंतर्गत म्युझिकल फाऊंटन उभारण्याचे नियोजन असून त्याकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

## (इ) केंद्र व राज्यशासन पुरस्कृत प्रकल्प

## सन २०१६-१७ मधील प्रस्तावित प्रकल्प

१. **स्मार्ट सिटी :-** स्मार्ट - सिटी अंतर्गत ठाणे शहराची महाराष्ट्रातील १० शहरामध्ये निवड झालेली असून ठाणे महानगरपालिकेने रु.६६३० कोटींचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केलेला असून त्यामध्ये ठाणे सिटी एरिया डेव्लपमेंट रु.५७३० कोटी व पॅन सिटी रु.९०० कोटीचा समावेश आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात महापालिका हिस्सा म्हणून **रु.५० कोटी** तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

२. **अमृत योजना :-** केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत मलनिःसारणासाठी रु.१११० कोटी व पाणी पुरवठा योजनेसाठी रु.९४४ कोटीसह रु.२०५४ कोटीचा प्रस्ताव राज्यशासनाकडे सादर केलेला असून त्यासाठी महानगरपालिका हिस्स्याच्या रक्कमेची तरतूद करणे आवश्यक आहे. अमृत योजनेअंतर्गत उद्यान विकासासाठी केंद्र शासनाने रु.१ कोटी अनुदान मंजूर केलेले असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**३. सर्वांसाठी घरे योजना :-** केंद्र शासनामार्फत घोषित केलेल्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरातील अस्तित्वातील झोपडपट्टीचे सुनियोजित नियोजन करुन एकात्मिकरित्या विकास करण्यासाठी डी.पी.आर.बनविण्याचा प्रशासनाचा मानस असून संपूर्ण शहरामध्ये सर्वांसाठी घरे उभारण्याचा अंतिम आराखडा व अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात येत आहे.

**४. भुयारी गटार योजना टप्पा १,२ व ३**

ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यांत आलेल्या जेएनएनयुआरएम अभियानाअंतर्गतच्या भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक १ ,२ व ३ साठी एकूण **रु. ९५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**५. आर्थिक दुर्बल घटकांसाठी मूलभूत सोयी ( बीएसयुपी )**

बीएसयुपी टप्पा क्रमांक १,३ व ४ ची कामे प्रगतीपथावर असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.११०.७८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**६. परिवहन बस खरेदी**

जेएनएनयुआरएम अंतर्गत परिवहन सेवेकरीता एकूण २३० बसेस पैकी २०० बसेस प्राप्त झालेल्या असून उर्वरित बसेस खरेदी करण्यासाठी **रु.३८.४३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## (फ) लोकसहभागातील प्रकल्प

महानगरपालिकेच्या मर्यादित उत्पन्नाचा विचार करता शहरातील महत्वाचे प्रकल्प कन्स्ट्रक्शन टी.डी.आर., पी.पी.पी. व सीएसआरच्या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे.

## अ. सन २०१६-१७ मध्ये लोकसहभागातून सुरु होणारे प्रकल्प

१. छोटी मलप्रक्रिया केंद्रे
२. घनकचरा विकेंद्रीकरण प्रकल्प
३. जाहिरातीचे हक्क देऊन चौकांचा व मोकळया जागांचा विकास व सुशोभिकरण व
४. पादचारी पूल
५. सिटी स्कॅन व एम.आर.आय. सुविधा
६. बायोमिथेनायझेशन प्लांट
७. मलप्रक्रिया केंद्रातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण
८. मृत जनावरे, कत्तलखान्यामधील कचरा, मार्केटमधील कचयावर प्रक्रिया करुन ऊर्जा व बायप्रोडक्टचे उत्पादन
९. फायर अलर्ट हॉट लाईन सिक्युरिटी सिस्टीम
१०. इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रॉनिक वेस्ट विल्हेवाट लावण्यासाठी ई-वेस्ट व्यवस्थापन
११. मोफत WIFI सुविधा व Digital Surveillance सह सीसीटीव्ही यंत्रणा संचलन
१२. सोलार पार्क निर्मिती
१३. सोलार फोटो व्होलटाइक यंत्रणा
१४. पाणी वितरण यंत्रणेवर जलविद्युत प्रकल्प
१५. स्मार्ट मीटर योजना
१६. ऊर्जा लेखापरीक्षण
१७. वॉटर किवॉस्क
१८. पाणी व्यवस्थापन व पाणी लेखापरीक्षण

## ब. सुविधा भुखंड व आरक्षणाचा विकास :

राज्य शासनाने दिनांक २९ जानेवारी, २०१६ चे शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकांमध्ये विकास हक्क हस्तांतरणाकरिता नवीन नियमावली लागू केली असून मूल्यावर्धीत विकास हक्क हस्तांरणाच्या माध्यमातून सुविधा विकसित करण्याबाबत नियम मंजूर करण्यात आले आहेत. सदर नियमानुसार

तसेच समावेशक आरक्षणाची धोरणानुसार ठाणे महानगरपालिकेने पुढील विकास कामे सन २०१६-१७ या वर्षात हाती घेण्याचे प्रस्तावित केले आहे. यातील काही कामे कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून प्रस्तावित केल्यामुळे महापालिकेचे अंदाजे **रु. २५२ कोटी** च्या सुविधा विनामूल्य हस्तांतरीत होऊ शकतील. तसेच समावेश आरक्षणाच्या विकसनामधून अंदाजे **रु. ५२ कोटी** च्या सुविधा विनामूल्य हस्तांतरीत होऊ शकतील. खाजगीकरणाद्वारे विकसित करावयाच्या सुविधा या **रु.१६५ कोटीच्या** आहेत.

**१. ज्युपिटर हॉस्पिटल शेजारी सुविधा भूखंडावर पार्किंग प्लाझा उभारणे.**

ज्युपिटर हॉस्पिटल शेजारी महानगरपालिकेच्या ताब्यातील १३५७.२३ चौ.मी. सुविधा भूखंडावर २५०० चार चाकी वाहनांसाठी पार्किंग प्लाझा विकसित करण्यात येणार आहेत. या मुळे सेवा रस्त्यावरील पार्किंग समस्या सुटण्यास मदत होईल.

**●ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य संवर्धन व मनोरंजना करीता सार्वजनिक उद्याने विकसीत करणे.**

**१. बाळकुम-कोलशेत रोड येथे सेंट्रल पार्क विकसित करणे.**

बायर इंडिया कंपनीमधील प्राप्त सुविधा भूखंडापैकी ३० एकर क्षेत्रफळावर "सेंट्रलपार्क" विकसित करण्यात येणार असून त्यामध्ये अस्तित्वातील झाडांचे संवर्धन, नवीन स्थानिक झाडांच्या प्रजातींची लागवड व संवर्धन, पार्किंग व्यवस्था, नेचर ट्रेल, जॉगींग ट्रॅक, तलाव निर्मिती, स्केट पार्क, ओपन जिम, गार्डन, पॅव्हेलियन ॲम्पी थिएटर, नेचर एज्युकेशन, मैदानी खेळासाठी मोकळी जागा अशा सुविधा प्राप्त होणार आहेत. सदर पार्क हे महापालिकेतील सर्वात मोठे उद्यान असेल.

## २. पोखरण रोड नं.२ येथे कम्युनिटी पार्कचा विकास

पोखरण रोड क्र. २ लगत आर. पी. जी. केबल कंपनीच्या प्राप्त भूखंडापैकी ८००० चौ.मी. क्षेत्रफळावर कम्युनिटी पार्क कंन्स्ट्रक्शन टिडीआर अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. सदर पार्क मध्ये बालकांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना मनोरंजनात्मक सुविधा उपलब्ध करण्याचा मानस आहे.

## ३. हिरानंदानी इस्टेट लगत बगीचाचे तलावासहीत विकसन (Southern Park)

बगीचा आरक्षण क्रमांक ९ चे तलावासह क्षेत्रफळ ५९००० चौ.मी. असून, त्यापैकी बगीच्याचे क्षेत्र ३५९०० चौ.मी. आहे व उर्वरित तलाव आहे. सदर आरक्षित क्षेत्र तसेच तलावाचे सुशोभिकरण विकास हक्क हस्तांतरण (टिडीआर) व्दारे खाजगी सहभागातून विकसन करण्याचे प्रस्तावित असून त्यामध्ये तलावाची स्वच्छता, संवर्धनाचा समावेश करण्यात येणार आहे. सदर विकसनात तलावात कारंजी व उद्यानात गझीबो, स्कल्पचर, अँफी थिअटर इत्यादी सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

## ४. ब्रम्हांड परिसरालगत पार्कचे विकसन (Northern Park)

ब्रम्हांड परिसरालगत पार्क आरक्षण क्र. ५ मधील ठाणे महानगरपालिकेस प्राप्त २२ एकर क्षेत्रावर पार्कचे विकसन कन्स्ट्रक्शन टिडीआर मार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये नेचर पार्क, नेचर ट्रेल, योग अभ्यासिका, प्रॅामिनाड, योगा सेंटर इत्यादी सुविधा उपलब्ध करण्याचा मानस आहे.

## ५. फाऊंटन पार्क

सेक्टर क्र. ५ येथील गार्डन आरक्षण क्र. ३ येथे ८२७८ चौ.मी. क्षेत्रावर फाऊंटन पार्क विकसित करण्याचे नियोजन आहे. या मध्ये जगातील प्रसिध्द असलेल्या कारंज्यांच्या प्रतीकृती विकसित करण्याचा मनोदय आहे.

- **आरोग्य विषयक सुविधांचे विकसन :**

**१. टाटा कॅन्सर रुग्णालय**

ठाणे महानगरपालिकेमार्फत टाटा कॅन्सर रुग्णालयास कोलशेत रोड येथे भूखंड नाममात्र लीज दराने देण्यात येणार असून सदर भूखंडावर टाटा कॅन्सर हॉस्पिटलचे बांधकाम टाटा मेमोरियल ट्रस्टतर्फे करण्यात येणार आहे.

**२. संकरा नेत्रालय**

ठाणे महानगरपालिकेस कोलशेत रोडवरील प्राप्त हॉस्पिटल आरक्षणापैकी ८४०० चौ. मी. क्षेत्र नेत्रालय व रिसर्च सेंटरकरिता संकरा नेत्रालय या संस्थेस देण्याकरिता महानगरपालिकेने सदर संस्थेसोबत Memorandom of Understanding केला असून शासनाच्या मान्यतेनंतर नाममात्र लीज दराने भूखंड उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर भूखंडावर संकरा नेत्रालयाचे काम दोन वर्षात पूर्ण होऊन नेत्रालय कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

**३. ज्येष्ठांचे नंदनवन (वृध्दाश्रम) (Elder's Paradise)**

पोखरण रोड नं. २ लगत व्होल्टास कंपनीच्या जागेवर प्राप्त होणा-या १२०० चौ. मी. सुविधा भूखंडावर बांधीव सुविधेअंतर्गत स्टेट ऑफ आर्ट सर्व सुविधांसहीत ज्येष्ठांचे नंदनवन (वृध्दाश्रम) इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर संस्थेचे परिचालन नामांकित अशासकीय सामाजिक संस्थेमार्फत सि.एस.आर. निधी अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

**४. मेडीटेशन व होलीस्टीक सेंटर**

घोडबंदर रोड येथील विजय विलास गृहनिर्माण प्रकल्पातून प्राप्त १५२० चौ.मी. क्षेत्राच्या सुविधा भूखंडावर होलीस्टीक सेंटरचे विकसन करण्यात येणार आहे. सदर संस्थेचे परिचालन नामांकित आंतरराष्ट्रीय सेवाभावी सामाजिक संस्थेमार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

**५. मॅटर्निटी होम आरक्षण समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसनाबाबत**

मौजे वडवली येथील मॅटर्निटी होम आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन करून घेण्यात येत आहे. मॅटर्निटी होम आरक्षणापैकी तळ अधिक ४ मजल्याची सुमारे १८४५.३६ चौ. मी. क्षेत्राची इमारत बांधून झालेली असून ती जागा वापरासाठी महापालिकेस उपलब्ध होणार आहे.

श्रीनगर येथील मॅटर्निटी होम आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन करून घेण्यात येत आहे. मॅटर्निटी होम आरक्षणापैकी तळ अधिक ६ मजल्याची इमारत बांधण्यात येत असून, सदर वास्तुमध्ये अद्ययावत प्रसुतीगृह सुरु करण्याचा मानस आहे.

- **सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस स्थानकांचा विकास करणे**

**१. कासारवडवली पोलीस स्टेशनचे विकसन**

घोडबंदर रस्त्यालगत कॉसमॉस ज्वेल्स हया गृहनिर्माण प्रकल्पातून प्राप्त झालेल्या सुविधा भूखंड क्षेत्र ३६४० चौ.मी. वर कासारवडवली पोलीस स्टेशनचे विकसन बांधीव सुविधेंतर्गत तळ अधिक तीन मजले पार्किंग व्यवस्थेसह बांधण्यात येणार असून सदर बांधकामापोटी ठाणे महानगरपालिकेस रु. ५ कोटी पोलीस विभागाकडून प्राप्त होणार आहे.

**२. कळवा पोलीस स्टेशनचे विकसन**

खारेगाव येथील मुंबई पुणे रस्त्यालगत ५९१.५७ चौ.मी. सुविधा भूखंडावर कळवा पोलीस स्टेशनचे विकसन बांधीव सुविधे अंतर्गत तळ ६ मजल्याचे बांधकाम करण्यात येणार असून सदर बांधकामापोटी ठाणे महानगरपालिकेस बांधकाम मूल्य रु.२.२० कोटी पोलीस विभागाकडून प्राप्त होणार आहेत.

**३. डायघर पोलीस स्टेशन विकसन**

शिळ नाका येथील अस्तित्वातील पोलीस स्टेशन लहान असल्यामुळे, डायघर येथील अस्तित्वातील जकात नाक्याचे

नुतनीकरण करुन त्या ठिकाणी डायघर पोलिस स्टेशन करण्याचे प्रस्तावित आहे.

**४. शीळ-कल्याण रस्त्यालगत खिडकाळी पोलीस स्टेशनचे विकसन**

शिळ-कल्याण रस्त्यालगत असलेल्या पोलीस स्टेशन आरक्षणाचे जागेवर समावेशक आरक्षणामधून विनामूल्य पोलीस स्टेशनचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर बांधकाम तळ अधिक दोन मजले प्रस्तावित असून, खिडकाळी, डायघर, शिळ, देसाई, डावले, पडले हया भागामधील कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता सदर पोलीस स्टेशन उपयुक्त ठरेल.

**५. दिवा पोलीस स्टेशन**

दिवा विभागाकरिता डावले येथील पोलीस स्टेशन आरक्षणाचे विकसन समावेशक आरक्षणामधून करण्याचे प्रस्तावित आहे.

- **अग्निशमन केंद्र विकसन**

**१. खारेगांव रेतीबंदर येथे अग्निशमन केंद्र उभारणे**

खारेगांव रेतीबंदर येथील आरक्षित भूखंडावर बांधीव सुविधेंतर्गत अत्याधुनिक अग्निशमन केंद्र व अग्निशमन कर्मचा-यांकरिता २० निवासी सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर अग्निशम केंद्रामुळे कळवा मुंब्रा विभागास शीघ्रतेने सेवा पुरविता येतील.

**२. ओवळा अग्निशमन केंद्र**

ओवळा येथे घोडबंदर रस्त्यालगत अग्निशमन केंद्राचे आरक्षण महानगरपालिकेच्या ३५००.०० चौ. मी. क्षेत्र ताब्यात असून, त्यावर कन्स्ट्रक्शन टिडीआर मार्फत अथवा महापालिका निधीतून अद्ययावत अग्निशमन केंद्र विकसित करण्यात येणार आहे. यामुळे झ पाटयाने विकसीत असलेल्या घोडबंदर परिसरातील वसाहतींना शीघ्रतेने सेवा पुरविणे शक्य होईल.

## • सामाजिक सुविधांचे विकसन

### १. आगरी - कोळी - आदिवासी सांस्कृतिक केंद्र

घोडबंदर रस्त्यालगत असलेल्या पुष्पांजली गृहनिर्माण प्रकल्पाअंतर्गत प्राप्त सुविधा भूखंड क्षेत्र १४८१ चौ.मी. वर आगरी-कोळी-आदिवासी समाजा करीता सांस्कृतिक केंद्र बांधीव सुविधे अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे.

### २. महिला व्यायामशाळा, अभ्यासिका व वाचनालय

साकेत बाळकुम रस्त्यालगत प्राप्त ५८८ चौ. मी. सुविधा भूखंडावर महिला व्यायामशाळा, अभ्यासिका व वाचनालय बांधीव सुविधे अंतर्गत तळ अधिक तीन मजले बांधकाम विकसित करण्यात येणार आहे.

### ३. नोकरदार महिलांकरिता वसतिगृह

घोडबंदर रस्ता परिसरातील सुविधा भूखंडावर २०० नोकरदार महिलांकरिता कन्स्ट्रक्शन टिडीआर च्या माध्यमातून हॉस्टेल व्यवस्था विकसित करण्यात येणार असून, सदर विकसनाचे व्यवस्थापन व देखभाली करिता पीपीपी तत्वावर अथवा केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यास सामाजिक संस्थेची नेमणूक करण्यात येईल.

### ४. मत्सालय विकसित करणे

कॅडबरी जंक्शन येथे सर्व्हिस रोड लगत प्राप्त होणा-या १६००० चौ.मी. सुविधा भूखंडावर अत्याधुनिक मत्स्यालय कंन्ट्रक्शन टी. डी.आर. अंतर्गत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

### ५. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक (NDRF)

पोखरण रस्ता क्र. २ येथील उर्वी पार्क हया गृहनिर्माण संकुलातून सुविधा भूखंडावर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक (NDRF) करीता कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून विकसन करण्यात येणार आहे. सदर पथकामुळे महापालिका क्षेत्रात आपत्तीचे वेळी शीघ्रतेने प्रतिसाद उपलब्ध होईल.

**६. पोखरण रस्ता क्र. १ येथे हॉकर झोन व पार्कींग विकसन**

रॅप्टॅकॉस कंपनीमधील सुविधा भूखंडावर तळ मजल्यावर हॉकर झोन व त्यावरील मजल्यांवर ५० वाहनांकरिता पार्कींग व्यवस्था बांधीव सुविधे अंतर्गत प्रस्तावित आहेत. यामुळे शास्त्रीनगर - देवदयानगर परीसरातील रस्त्यावर होणा-या पार्किंग व फेरीवाल्यांच्या समस्या काही प्रमाणात दूर होऊ शकतील.

**७. वर्तकनगर नाका येथे दुचाकी वाहन पार्कींग व शॉपिंग प्लाझा विकसन**

वर्तकनगर नाका येथील म्हाडाने महापालिकेस ताबा दिलेल्या भूखंडावरील अतिक्रमणे हटवून त्या जागी प्रकल्प बाधितांकरिता शॉपिंग प्लाझा विकसित करण्यात येणार असून, सदर शॉपिंग प्लाझ ाच्या बेसमेंटमध्ये २५० टु व्हिलर पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. सदर सुविधा शक्य झाल्यास खाजगी सहभागातून अथवा महापालिकेच्या निधीतून प्रस्तावित आहे.

**८. जवाहरबाग स्मशानभूमी विस्तारीकरण व आधुनिकीकरण**

अस्तित्वातील परंपरागत जवाहरबाग स्मशानभूमी १८८२ चौ.मी. क्षेत्रफळावर असून, सदर स्मशानभूमी वाढत्या लोकसंख्येच्या मानाने अतिशय अपुरी आहे. सदर स्मशानभूमीचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण करण्याकरिता महापालिकेची लगतची अस्तित्वातील कार्यालये हटवून क्षेत्रफळात १००० चौ. मी. ने वाढ करण्यात येत आहे. सदर स्मशानभूमीचा विकास विनामोबदला तत्वावर धर्मादाय संस्थेमार्फत करुन घेण्यात येणार आहे. सदर विस्तारीकरणात अंदाजे २०० नागरिकांना अत्यंविधीच्यावेळी बसण्याची सोय, लहान मुलांच्या अस्तित्वातील दफनभूमीमध्ये दुप्पटीने वाढ, एकूण चार गॅस शवदाहिनी, बगीचा, शवदाहिनी करीता नऊ प्लॅटफॉर्मसह धूर गोळा करण्यास चिमणी व एक्झॉस्ट फॅन आणि धूर बाहेर पाडण्याअगोदर फिल्टरचे संयोजन करण्यात येणार आहे. धूर विरहीत व्यवस्थेमुळे परिसरातील नागरिकांना प्रदुषणाचा कमीत कमी उपद्रव होईल.

## ९. कोलशेत रस्त्यालगत एव्हरेस्ट गृहनिर्माण प्रकल्पा व्हेजीटेबल मार्केट व शॉपींग सेंटर विकसित करणे

कोलशेत रस्त्यालगत असलेल्या डिस्ट्रीक सेंटरचे आरक्षणाचे विकसन समावेशक आरक्षणातून विकसित करण्यात येत असून, सदर आरक्षणाचे जागेत २५०० चौ. मी. क्षेत्राचे व्हेजीटेबल मार्केट व शॉपींग सेंटर विकसित करण्यात येणार आहे.

## १०. मार्केट व लायब्ररी आरक्षण विकसनाबाबत

मौजे बोरीवडे येथील मार्केट व लायब्ररी आरक्षणातून समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसन करून घेण्यात येत आहे. मार्केट व लायब्ररी आरक्षणापैकी तळ अधिक ३ मजल्याची सुमारे ३१८० चौ. मी. क्षेत्राची इमारत बांधून मिळणार आहे. त्यामध्ये तळ अधिक १ मजल्यावर मार्केट आहे व वरील मजल्यावर लायब्ररी व हॉल प्रस्तावित केलेले आहे.

- **प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाकरीता योजना**

महापालिकेने हाती घेतलेल्या महत्वांकाक्षी रस्ता रुंदीकरण व Missing Links चा विकास या मध्ये मोठया प्रमाणावर बाधित बांधकाम धारकांचे पुनर्वसन करण्याकरिता खालील प्रमाणे नियोजन आहे.

शासनाने मंजूर करणाऱ्या परवडणारी घरे योजनेमधून २५ चौ. मी. क्षेत्रफळाची एकूण ३९२४ घरे प्राप्त होणार असून, यापैकी महानगरपालिकेस ८५५ घरे प्राप्त होणार आहेत.

हौसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणाचे विकसनामध्ये महानगरपालिकेस ४९७ घरे प्राप्त होणार असून, बी.एस.यु.पी. प्रकल्पांअंतर्गत येत्या अर्थिक वर्षात महानगरपालिकेस १४२५ घरे प्राप्त होणार आहेत. तसेच रेंटल हौसिंग योजनेमध्ये येत्या वर्षात महानगरपालिकेस ३६०० घरे उपलब्ध होणार आहेत.

या शिवाय पुढील प्रकल्प नियोजित आहेत.

## १. कोकणीपाडा येथे प्रकल्प बाधितांकरिता घरे

पोखरण रोड क्र. २ येथे निळकंठ गृहनिर्माण प्रकल्पासमोर कोकणीपाडा येथे हौसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणाच्या ४६२० चौ. मी. क्षेत्रफळावर प्रकल्प बाधितांकरिता ३५८ घरे निर्मिती आणि ४३ वाणिज्य गाळयांकरिता एकूण ८ इमारती बांधिव सुविधे अंतर्गत बांधण्यात येणार असून सदर घरे आणि वाणिज्य गाळयांचा वापर रस्ता रुंदीकरणात बाधित नागरिकांच्या पुनर्वसनाकरिता करण्यात येणार आहे.

## २. घोडबंदर रोड येथे बेघरांसाठी घरे आरक्षण विकसन

घोडबंदर रस्त्यालगत सेक्टर क्र. ६ मधील बेघरांसाठी घरे हे आरक्षण विकसित करण्यात येत असून, सदर आरक्षणाखालील दोन प्रस्तावंतर्गत सुमारे ८१०० चौ. मी. क्षेत्र असून, महापालिकेस एकूण १४८८ चौ. मी. क्षेत्राच्या ५१ सदनिका उपलब्ध होणार आहेत. सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेस तळ अधिक ६ व तळ अधिक ७ अशा दोन स्वतंत्र इमारती प्राप्त होणार आहेत.

सेक्टर ५ मधील कोलशेत येथे बेघरांसाठी घरे हया आरक्षणापैकी १३०३० चौ.मी. क्षेत्रावर विकसनाचा प्रस्ताव असून, महापालिकेस २६११.०० चौ.मी. क्षेत्राच्या एकूण ८८ सदनिका उपलब्ध होणार आहेत. सदर इमारत स्टिल्ट अधिक १६ मजल्याची आहे. सदर घरे आणि वाणिज्य गाळयांचा वापर रस्ता रुंदीकरणात बाधित नागरिकांच्या पुनर्वसनाकरिता करण्यात येणार आहे.

## ३. म्युनिसिपल हौसिंग आरक्षणाचे विकसन

पूर्व द्रुतगती महामार्गालगत असलेल्या चिराग नगर परिसरातून म्युनिसिपल हौसिंग विकसन समावेशक आरक्षणामधून करण्यात येत असून, भूखंडाच्या एकूण क्षेत्राच्या ५०% क्षेत्र बांधकामाच्या २०० सदनिका पार्किंग व्यवस्थेसह महानगरपालिकेस प्राप्त होणार आहेत.

### ४. औद्योगिक गाळयांचे पुनर्वसनाकरिता Service Industry करीता भूखंड उपलब्ध करुन देणे

महापालिकेने हाती घेतलेल्या रस्तारुंदीकरण मोहिमे अंतर्गत विस्तापित होणा-या गाळे धारकांचे पुनर्वसनाकरिता खारेगावे टोलनाका येथे अंदाजे ६००० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड निश्चित करण्यात आलेला आहे.

- **शैक्षणिक भूखंडाबाबत**

ठाणे महानगरपालिकेने यापूर्वी स्थानिक व अस्थानिक शैक्षणिक संस्थांसाठी अनुक्रमे ७ व ९ भूखंडांसाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. एकुण १६ भूखंडापैकी १० निविदा अंतिम झालेल्या असून, उर्वरित ६ भूखंड व नव्याने प्राप्त झालेल्या शाळा आरक्षणाखालील ४ भूखंड अशा एकूण १० भूखंडांसाठी विनंती अर्ज या अर्थिक वर्षात मागविणे प्रस्तावित आहे.

## (२) पाणी पुरवठा विभाग

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

### १. विकासकामार्फत बांधण्यांत आलेल्या जलकुंभाचे कार्यान्वयन

ठाणे महानगरपालिकेमार्फत विकासकाच्या माध्यमातून वर्तकनगर येथे १.५ द.ल.लि., आकृती हबटाऊन येथे ३.०० द.ल.लि., भाईंदर पाडा येथे १.५ द.ल.लि. व शीळ फाटा येथे २.०० द.ल.लि. क्षमतेचे एकूण ४ जलकुंभ बांधण्याची कामे सुरु असून हबटाऊन या ठिकाणी बांधण्यांत आलेले जलकुंभ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कार्यान्वित करणेचा महापालिकेचा मानस आहे. जलकुंभ बांधण्यासाठी **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

# सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

## १. वितरण व्यवस्थेचा विस्तार व मजबुतीकरण

ठाणे शहराच्या पूर्व भागात येणा-या कळवा प्रभाग समिती क्षेत्रात वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी रिमॉडेलिंग प्रकल्पाअंतर्गत ६ जलकुंभ बांधणे व जलकुंभासाठी वहन वाहिन्या अंथरणे या कामी सन २०१५-१६ मध्ये रु. ३ कोटीची तरतूद करण्यांत आली असून, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात एकूण **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## २. जलकुंभ बांधणे

- सिध्दांचल सोसायटी फेज -६ जवळचा जलकुंभ आणि संप व पंप हाऊस बांधणे माजिवडा -बाळकूम येथील बांधण्यांत येणा-या जलकुंभासाठी वहन व वितरण व्यवस्था अंथरणे
- गांधीनगर व आनंदनगर येथे नवीन जलकुंभ बांधण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.
- खाजगी सहभागातून कोलशेत, वाघबीळ व भाईंदरपाडा येथे नवीन जलकुंभ बांधण्याचे प्रस्तावित आहे.

## ३. जलवाहिन्या टाकणे

महापालिका हद्दीत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकणेसाठी **रु. ४ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

## ४. अत्याधुनिक जलकुंभ सफाई मशीन

दूषित पाणी होऊ नये यासाठी जलकुंभाची सफाई तात्काळ होणे आवश्यक आहे. त्यासाठी अत्याधुनिक जलकुंभ सफाई मशीन घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ५. जलकुंभांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई

ठाणे शहरातील एकूण ५३ जलकुंभ व १७ संप यांची शास्त्रोक्त पध्दतीने सन २०१६-१७ मध्ये साफसफाई करण्यांत येईल. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## स्मार्ट सिटी व अमृत योजनेअंतर्गत पाणी पुरवठयाची प्रस्तावित कामे

१. अमृत योजनेअंतर्गत ठाणे शहरातील वितरण वहन व साठवण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग करणे - रु. ४७०.४५ कोटी

२. सर्व संयोजनांवर जलमापके बसविणे - रु. १८८.१० कोटी

३. हाऊस सर्व्हीस कनेक्शन बदलणे, वितरण व वहन व्यवस्थेतील गळती काढणे - रु.२८५.२४ कोटी

## (३) मलनि:सारण विभाग

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

### १. भुयारी गटार योजना

JNNURM अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्र.१ चे काम पूर्णत्वास आलेले असून शिल्लक काम करुन घेण्यात येत आहे. १२० दशलक्ष लिटर क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र व सात मलउदंचन केंद्र यापूर्वीच कार्यान्वीत केले असल्याने नौपाडा, कोपरी, उथळसर, वागळे इस्टेट, रायलादेवी, लोकमान्य नगर- सावरकरनगर व वर्तकनगर या प्रभाग समिती क्षेत्रातील सांडपाणी मुख्य मलनि:स्सारण योजनेस जोडले जाणार आहे.

**२. भुयारी गटार योजना टप्पा क्र.२** अंतर्गत मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्राचे काम जागेअभावी करता आलेले नव्हते. परंतु युध्दपातळीवर प्रयत्न करून ४ मलप्रक्रिया केंद्र व सर्व ७ उदंचन

केंद्राचे काम सुरू करण्यात आलेले असून या आर्थिक वर्षात हे काम पूर्ण करण्याचा मानस आहे.

३. **भुयारी गटार योजना टप्पा क्र.३** अंतर्गत मलप्रक्रिया केंद्र व मलउदंचन केंद्राचे काम पूर्ण करून मलवाहिनीचे ८० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरीत २० टक्के काम ट्रेंचलेस पध्दतीने व छोटया स्वरूपाची मलउदंचन केंद्राचे काम पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### १. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी छोटया स्वरूपाचे मलप्रक्रिया केंद्र बांधून रोजच्या सांडपाण्यावर टर्शरी ट्रिटमेंट करून निर्जंतूक केलेल्या पाण्याचा वापर दैनंदिन वापरामध्ये उदा. बगीचा, कार वॉशिंग, फ्लशिंग कामासाठी प्रायोगिक तत्वावर करण्याचे महापालिकेच्या विचाराधीन असून त्याकरिता पी.पी.पी. किंवा बी.ओ.टी. तत्वावर २ ते ५ व ५ ते १० द.ल.लि. क्षमतेचे टर्शरी टिट्रमेंट प्लान्ट बांधण्याकरिता देकार मागविण्यात आले आहेत. तसेच कोपरी येथील १२०द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रात सुध्दा लहान स्वरूपाचे टर्शरी ट्रिटमेंट प्लान्ट बांधून देखभाल व दुरूस्तीसह पी.पी.पी. अथवा बी.ओ.टी. तत्वावर बांधणे व चालविणेकरिता देकार मागविण्यात आले आहे. वरील दोन्ही योजना पुढील आर्थिक वर्षात राबविण्यात येणार आहे.

### २. जेटींग मशीन खरेदी

सन २०१५-१६ मध्ये दोन जेटींग मशीन खरेदी करण्यात आलेल्या असून मार्च अखेर पर्यंत नवीन दोन जेटींग मशीन खरेदी करण्यात येणार आहेत. सदर जेटींग मशिनची उपयुक्तता सिध्द झाल्याने नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अजून दोन जेटींग मशीन खरेदी करण्याचे प्रयोजन असून त्यासाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## ३. सेप्टीक टँक बांधणे

स्वच्छ ठाणे अभियान अंतर्गत डोंगराळ भागात व ज्या ठिकाणी मलवाहिन्या नाहीत त्या ठिकाणी नागरिकांना सार्वजनिक शौचालयाची सुविधा देण्यासाठी रेडिमेड शौचालय खरेदी करुन त्या ठिकाणी सेप्टीक टँक बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी सन २०१६-१७ साठी **रु. ३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

# (४) घनकचरा व्यवस्थापन विभाग

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

**१. घरोघरी कचरा संकलन -** ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील २२०० कर्मचारी व १२०४ कंत्राटी कामगारामार्फत शहरातील लहान मोठया रस्त्यांची साफसफाई करुन निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन करुन घंटागाडी व कॉम्पॅक्टरमार्फत हस्तांतरण स्थानकापर्यंत वाहतूक करण्यात येते. घरोघरी निर्माण होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याचे संकलन करण्यासाठी बंद स्वरुपातील देन कप्पे असलेल्या हायड्रोलिक वाहनामार्फत करण्यात येते. बंद स्वरुपातील वाहनामध्ये ओला व सुका कचरा स्वीकारणेसाठी स्वतंत्र दोन कप्पे असणाऱ्या हायड्रोलिक घंटागाडयांमार्फत करण्यात येते.

ठाणे शहरातील झोपडपट्टया व डोंगर उतारावरील वस्त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे वाहन जावू शकत नाही अशा ठिकाणी कचरा संकलकामार्फत घरोघरी जावून कचरा संकलित केला जातो व सदरचा कचरा घंटागाडी व कॉम्पॅक्टर मध्ये जमा करुन हस्तांतरण स्थानकापर्यंत वाहतूक करण्यात येतो.

**२. घनकचऱ्याची विल्हेवाट -** वेस्ट टु एनर्जी प्रकल्प उभारण्यासाठी निविदाकाराबरोबर करारनामा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ६५० मेट्रीक टन दैनंदिन कचऱ्याची निर्मिती होत असून निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यापैकी हिरानंदानी इस्टेट, पातलीपाडा येथे ५ टन व लोढा गृहसंकुल येथे ५ टन क्षमतेचा बायोगॅस निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे. शिवाजी महाराज रुग्णालय परिसर कळवा, मित्तल गृहसंकुल रघुनाथनगर, साकेत गृहसंकुल, तारांगण, कोरस गृहसंकुल व सीपी तलाव येथे प्रत्येकी २-२ टन क्षमतेचे कंपोष्टींग प्रकल्प सुरु केलेले आहेत. अशाप्रकारे १२ टन कचऱ्यापासून खतनिर्मिती करण्यात येत आहे. उर्वरीत कचऱ्याची विल्हेवाट डायघर येथील जागेवर लावण्यास स्थानिक नागरिकांकडून विरोध होत असल्यामुळे घनकचऱ्याचे व्यवस्थापन खाजगी १५ एकर जागेमध्ये जागा मालकाची आवश्यक ती परवानगी घेऊन सद्यस्थितीत खर्डी गांव, दिवा येथे शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट करण्यात येते.

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

**१.विकेंद्रित व कचऱ्याच्या प्रकारानुसार कचऱ्याची विल्हेवाट :**

१. व्हेजिटेबल्स वेस्ट पासून सी.एन.जी. - क्षमता २० टन प्रति दिन

२. वेस्ट प्लास्टिक पासून ऑईल तयार करणे. - क्षमता ५ टन प्रति दिन

३. गार्डन वेस्ट पासून फ्युएल ब्रिकेट्स तयार करणे. - क्षमता २५ टन प्रति दिन

४. कत्तलखाने व मृत जनावराच्या अवशेषापासून सी.एन.जी./बायोगॅस तयार करणे.- क्षमता १० टन प्रति दिन

५. गृहनिर्माण संकुलामध्ये कचऱ्याचे विभक्तीकरण करुन बायोकंपोस्टींग/व्हर्मीकंपोस्टींग, बायोमिथेनायझेशन व यांत्रिकी पध्दतीने कंपोस्टींग करण्यासाठी लहान लहान प्रकल्प उभारणी.

६. ई- वेस्ट चे संकलन करण्यासाठी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.- क्षमता १० टन
७. डेब्रीजपासून बांधकाम साहित्य निर्मिती - १२० टन क्षमता

**२.मल्टीपर्पज एक्सकॅव्हेटर**

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये मल्टीपर्पज एक्सकॅव्हेटर, स्टेशनरी कॉम्पक्टर, इत्यादी घेण्यासाठी **रु.३.५० कोटीची** तरतूद प्रस्तावित आहे.

**३. यंत्राद्वारे कचऱ्याचे विभक्तीकरण (Mechanical Segregation)**

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० अन्वये कचरा निर्मितीच्या ठिकाणी त्याची विभक्तीकरण होणे गरजेचे आहे. याकरिता मोठया गृहसंकुलातील कचरा विभक्तीकरण करण्यास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. परंतु झोपडपट्टी व बैठया चाळी या भागातील यांत्रिक पध्दतीने कचऱ्याचे विभक्तीकरण करणेसाठी ३०० टन क्षमतेचा प्रकल्प सुरु करण्यात येणार असून याकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**४. घनकचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा कार्यान्वित करणे**

ठाणे शहरात निर्माण होणाऱ्या ७०० टन कचऱ्याचे संकलन व वाहतूक करणेकामी लहान/मोठी २१५ वाहने वापरण्यात येत आहेत. या वाहनांवर नवीन वर्षामध्ये १०० टक्के जीपीएस यंत्रणा लावण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.०.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**५.शून्य कचरा मोहिम**

शहरातील प्रत्येक प्रभाग समितीमधील एका प्रभागामध्ये शून्य कचरा ही संकल्पना राबवून कचऱ्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२५ लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

## ६.हजेरी पेटयांवर सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे

शहराची दैनंदिन सफाई करणेसाठी महापालिकेची व कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेले एकूण ३९०३ कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेसाठी ४८ हजेरी शेड कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. याठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे व बायोमेट्रीक मशीन बसविण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२५ लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

## ७.शहर हगणदारीमुक्त करणे

ठाणे शहराची लोकसंख्या अंदाजे २० लक्ष असून पैकी ७१ हजार कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय नसल्याचे आढळून आले आहे. याकरिता ज्याठिकाणी जागा उपलब्ध होते अशा ठिकाणी वैयक्तिक शौचालये बांधणे, ज्याठिकाणी जागा उपलब्ध होत नाही अशाठिकाणी सामुदायिक शौचालय बांधणे व बाजारपेठा, बस स्टँड, रेल्वे स्थानके अशा वर्दळीच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधून शहर ३१ मार्च, २०१७ पर्यंत हगणदारी मुक्त करण्यात येणार आहे.

## ८.महिलांसाठी शौचालय

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरातील बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी "विशेष महिला शौचालय" प्रत्येक प्रभाग समितीत उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## ९. यंत्राद्वारे सार्वजनिक रस्त्यांची सफाई

सन २०१५-१६ या वर्षामध्ये यंत्राद्वारे सार्वजनिक रस्त्यांची सफाई करणेची योजना आखण्यात आली होती.त्यास मा.महासभेची मान्यता प्राप्त झालेली असून दोन रस्ते सफाई मशीन व एक रोबोट खरेदी करणेची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## १०. सफाई मार्शल

सन २०१५-१६ या वर्षामध्ये शहरातील नागरिकांना स्वच्छतेची सवय लावणेसाठी सफाई मार्शल नियुक्त करणेची योजना आखण्यात आली होती.त्यास मा.महासभेची मान्यता प्राप्त झालेली

असून सफाई मार्शल नियुक्त करणेची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**११. हरित कच-यापासून जळाऊ इंधन तयार करण्याच्या १० टन प्रति दिन क्षमतेचा प्रकल्प उभारणी करणे व १० वर्ष चालविणे.**

सदर प्रकल्पामध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीतील १० टन प्रति दिन हरित कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून त्यापासून जळाऊ इंधनाची निर्मिती करण्यात येणार आहे.सदर प्रकल्पाकरिताच्या आवश्यक बाबींची पूर्तता संबंधीत कंपनीद्वारे करण्यात आलेली असून जून २०१६ पर्यंत सदर प्रकल्पाचा प्राथमिक टप्पा सुरु होईल.

**१२. छत्रपती शिवाजी रुग्णालय परिसरात १५ MT क्षमतेच्या बायोमिथेनाझेशन प्लाण्टची BOT तत्त्वावर उभारणी करुन निगा व देखभालीसह २० वर्षे चालविणे**

सदर प्रकल्पामध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीतील २५ टन प्रति दिन हॉटेल, किचन, मार्केट वेस्टपासून Bio-CNG निर्मिती करण्यात येणार आहे.सदर प्रकल्पाकरिताच्या आवश्यक बाबींची पूर्तता संबंधीत कंपनीद्वारे करण्यात आलेली असून जून २०१६ पर्यंत सदर प्रकल्प कार्यान्वीत होईल.

**१३. २ ते ५ टन प्लॅस्टिक कचऱ्यापासून इंधन तयार करणे.**

कचरा वेचकांद्वारे वर्गीकरण केलेला प्लास्टीक कचरा सदर प्रकल्पामध्ये वापरण्यात येणार आहे.MPCB द्वारे आवश्यक परवानगी प्राप्त झाल्यानंतर सहा ते आठ महिन्यांत सदर प्रकल्पाची उभारणी होऊन प्रकल्प कार्यान्वीत करण्यात येईल.

**१४. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ई-कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा PPP तत्त्वावरील ५ वर्षे कालावधीसाठीचा प्रकल्प**

या प्रकल्पाच्या माध्यमातून ठाणे शहरातील महत्वाच्या १०० ठिकाणांवर ई-कचरा संकलन केंद्रांची उभारणी करण्यात येणार

आहे.ई-कचरा संकलन केंद्रांवर संकलित झालेला ई-कचरा एकत्रित करुन, त्याची वाहतुक व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार विल्हेवाट संबंधित PPP भागीदाराद्वारे लावण्यात येईल.

**१५. मृत जनावरे कत्तलखान्यामधील कचरा, फिश मार्केट, मटण मार्केट, पोल्ट्री येथील कचऱ्यावर प्रक्रिया करुन एनर्जी व उपयुक्त बायप्रॉक्ट्स तयार करण्याचा प्रकल्प PPP त्त्वावर १० वर्षे राबविणे**

मृत जनावरे व कत्तलखान्यातील कचऱ्यापासून By-Products व एनर्जी तयार करण्याच्या २० टन प्रति दिन क्षमतेच्या प्रकल्पाची उभारणी करुन PPP तत्वावर १० वर्षे कालावधीसाठी राबविण्यांत येणार आहे.

**१६. बांधकाम व पाडकाम टाकाऊ कचऱ्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणे**

सदर प्रकल्प उभारणीनंतर ठाणे शहरातील बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या १२० मेट्रीक टन कचऱ्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करण्यात येणार आहे.

**१७. स्वच्छ भारत अभियान**

केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचलयासाठी प्रति कुटूंब रु.१२,००० अनुदान मंजूर केले असून ठाणे महानगरपालिकेने स्व:निधीमधून रु.२००० अतिरिक्त अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत २१९६ लाभार्थ्यांना रु.६,००० प्रमाणे पहिला हप्त्याच्या रकमेचा रु.१.३१ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

स्वच्छ भारत अभियाना व्यतिरिक्त महानगरपालिकेने स्व:निधीतून रु.५ कोटीची तयार शौचालये (Readymade Toilets) घेण्यासाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच Human for Habitat या संस्थेकडून रु.३.५० कोटीची १० सिटची १० शौचालये घेण्यासाठी करारनामा केलेला आहे. या व्यतिरीक्त UNDP च्या सी.एस.आर. निधीमधून रु.२.७५ कोटीची ११ सिटची ४५ युनिटची तयार शौचालये घेण्याचे नियोजन आहे.

# (५) शिक्षण विभाग

## सन २०१६-१७ मधील प्रस्तावित योजना

### १. शाळांना संरक्षक भिंत बांधणे

महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये टप्या -टप्याने संरक्षक भिंत बांधण्याचे प्रस्तावित असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### २. मुलींसाठी नवीन शौचालय

महापालिका शाळेतील विद्यार्थीनींच्या आरोग्य व सोयीसाठी प्रत्येक शाळेमध्ये मुलींसाठी २ नवीन शौचालय बांधण्याचे प्रस्तावित आहे.

### ३. शाळांची दुरुस्ती व रंगरंगोटी

महापालिकेच्या सर्व शाळांना एकाच प्रकारचा रंग देऊन टप्प्या- टप्प्याने रंगरंगोटी करण्यात येणार असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ४. सर्व शाळांवर सोलार सिस्टिम

महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये टप्प्या- टप्प्यांमध्ये सोलार सिस्टिम बसविण्यात येणार असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ५. अनुताई वाघ बालउत्कर्ष योजना.

बालवाडींचा दर्जा सुधारुन पटसंख्या वाढविण्यासाठी **अनुताई वाघ बालउत्कर्ष योजना** करण्याचे प्रस्तावित असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ६. गोपाळ गणेश आगरकर सेमी इंग्लिश स्मार्ट स्कूल

महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी अस्तित्वातील शाळा व कल्याण फाटा जकात नाका इमारतीत सेमी

इंग्रजी बालवाडी व प्राथमिक शाळा सुरु करण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

**७. डॉ.अब्दुल कलाम व्हर्च्युअल क्लासरुम**

विद्यार्थ्यांना तज्ज्ञ शिक्षकाचे ऑनलाईन पध्दतीने शिक्षण व मार्गदर्शन मिळण्यासाठी तसेच वेळ व मनुष्यबळ बचत करुन एकाच वेळी अनेक शाळांना मार्गदर्शन करणेसाठी व्हर्च्युअल क्लासरुम उभारणेचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**८. राजमाता जिजाऊ कृतियुक्त अध्ययन पध्दती योजना**

महिली ते पाचवी च्या विद्यार्थ्यांची ज्ञानरचनेवर आधारित पूर्वज्ञानाची ओळख करुन ग्रहणक्षमता, आकलनशक्ती वाढविण्यासाठी व साहित्याची हाताळणी करुन कृतिशीलता वाढीस लावण्यासाठी कृतियुक्त अध्ययन पध्दती सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**९. सुरक्षित शाळा प्रकल्प**

विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सामाजिक व वैयक्तिक सुरक्षिततेसाठी व शाळा इमारत सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून सर्व शाळा इमारतींमध्ये मुख्याध्यापक व पालक यांच्या सल्ल्यानुसार सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे.

**१०. आर के लक्ष्मण कला- क्रीडा विकास योजना**

विद्यार्थ्यांचा शारिरीक व सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने व कला व क्रीडागुणांना वाव देण्यासाठी कला व क्रीडा विकास योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये तज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**११. अपघात विमा योजना**

बालवाडी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास त्यांच्यावर चांगले उपचार व्हावेत व त्याचे जीवन सुरक्षित व्हावे यासाठी अपघात विमा योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

### १२. एकलव्य रात्रशाळा

आठवी नंतर आर्थिक परिस्थितीमुळे अर्धवट शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्याचे दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी एकलव्य रात्रशाळा सुरु करण्याचे नियोजीत आहे.

### १३. सर होमी भाभा टॅब योजना

महानगरपालिका शाळेतील आठवीच्या विद्यार्थ्यांना संगणकाची जाण व्हावी व अभ्यासक्रमही संगणकावर उपलब्ध होऊन गुणवत्ता वाढविण्यासाठी टॅब पुरवठा करण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### १४. फेस रिडींग यंत्रणा

प्रशासकी शिस्त येण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थितीची नोंद होण्यासाठी सर्व शाळांमध्ये फेस रिडींग बसविण्याचे नियोजन आहे.

### १५. आर्यभट्ट डिजिटल माध्यमिक शाळा प्रकल्प

दहावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी ऑडिओ - व्हिज्युवल क्लासरुम तयार करुन त्यांना तज्ञ शिक्षकांचे स्टडी मटेरियल पुरवून मार्गदर्शन करण्यासाठी डिजिटल माध्यमिक शाळा प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

### १६. सिग्नल शाळा प्रकल्प

अनुताई वाघ यांच्या प्रेरणेतून जेथे मूल तेथे शाळा या संकल्पनेवर आधारित शहरातील कॅडबरी जंक्शन व नितीन कंपनी येथील सिग्नल जवळ लहान मुले फिरत असतात. त्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून राईट टू एज्युकेशन चा एक भाग म्हणून सिग्नलजवळ फिरती शाळा सुरु करण्याचे प्रयोजन असून त्या फिरत्या शाळेसाठी दोन मोठया स्वरुपाची वाहने घेऊन त्यामध्ये शिक्षणाच्या सोयी करुन मुलांना भोजनासह अध्यापन करण्याचा मानस आहे.

# (६) आरोग्य विभाग

## अ) सार्वजनिक आरोग्य विभाग

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### १. मध्यवर्ती पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळा उभारणी

मध्यवर्ती पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळेची उभारणी करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून कमी खर्चात नागरिकांना रक्तनमुने व इतर आरोग्य तपासण्याची सोय उपलब्ध होईल.

### २. मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सोय

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात कोरस रुग्णालय, वर्तकनगर येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया सुरु करण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु. ५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

### ३. डायलेसिसची सुविधा उपलब्ध करणे

ठाणे महापालिका क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाव्यतिरिक्त महापालिकेच्या इतर कोणत्याही रुग्णालयात डायलेसिस सुविधा उपलब्ध नाही. म्हणून २०१५-२०१६ मध्ये ३ ठिकाणी डायलेसिसची सुविधा उपलब्ध होणार असून व सन २०१६-२०१७ मध्ये २ ठिकाणी डायलेसिस केंद्राची निर्मिती करण्यांत येणार आहे. सदरची सेवा उपलब्ध झाल्यानंतर वार्षिक रु.१ लक्ष पेक्षा कमी उत्पन्न गटातील नागरिकांना डायलेसिस सेवा मोफत उपलब्ध होणार आहे व ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्ष ते ४.५ लक्ष आहे त्यांना ५० टक्के सूट देण्यात येईल. त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### ४. कॅन्सर निदान केंद्र सी.आर.वाडिया रुग्णालय येथे सुरु करणे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील महिलांना होणा-या गर्भाशयाचा व स्तनाचा कॅन्सर तपासणी करण्यासाठी सी.आर. वाडिया रुग्णालयात कॅन्सर निदान केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

### ५. लोकसहभागातून पीपीपी माध्यमातून अद्ययावत MRI व CT स्कॅनची सुविधा

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये लोकसहभागातून पीपीपी च्या माध्यमातून अद्ययावत MRI व CT स्कॅनची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निविदेची कार्यवाही सुरु आहे.

### ६. संसर्गजन्य रुग्णालयाची निर्मिती करणे

संसर्गजन्य रुग्णांना आयसोलेट करुन उपचार करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे १००% अनुदान मिळाल्यास राखीव भूखंडावर १०० खाटांचे संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याचा प्रयत्न केला जाईल. महानगरपालिकेस यासाठी खर्च करावा लागणार नाही.

## (ब) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### १. रुग्णालयाचे संगणकीकरण

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या (MCI) निर्देशानुसार बंधनकारक असणा-या या संगणकीकरणाची उभारणी व अंमलबजावणी प्रथमतः बाहयरुग्ण विभागात व त्यानंतर आंतररुग्ण कक्षात केली जाईल. सदरची यंत्रणा पुढील पाच वर्षात BOT तत्वावर राबविण्यात येईल.

## २. NICU

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील NICU विभागाचे विस्तारीकरण करुन सध्या २५ खाटांवरुन ४० खाटांचा विभाग तयार करण्याचा मनोदय आहे.

## ३. लर्निंग डिसॅबिलीटी असणा-या बालरुग्णांसाठी स्वतंत्र क्लि-नीक

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात असणा-या बालरोग व मापसोपचार कक्षाच्या मदतीने लर्निंग डिसॅबिलीटी असणा-या बालरुग्णांसाठी स्वतंत्र क्लि-नीक सुरु करण्याचा मनोदय आहे.

## ४. कॅथलॅब सेवा

खाजगी, सरकारी व भागीदारीतून तत्वावर (PPP) सुरु करण्याचे प्रस्तावित असून जागेचा वापर, वीज, पाणी, महा-नगरपालिकेतर्फे देणे, संचलन निगा व देखभाल खाजगी संस्थेने करणेचे प्रस्तावित आहे.

# (७) वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग

# सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

## १. कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून उदयान कामे

१. कावेसर येथे हिरानंदानी इस्टेट जवळ Southern Park
२. बाळकूम कोलशेत येथील ३० एकर सुविधा भूखंडाच्या जागेत Central Park
३. ब्रम्हांड येथील २२ एकर सुविधा भूखंडावर Northern Park
४. घोडबंदर रोड जवळ २ एकर सुविधा भूखंडावर Fountain Park
५. कावेसर येथे ८ एकर सुविधा भूखंडावर सेक्टर -३ मध्ये अमृत योजना, महापालिका निधी व प्रायोजकामार्फत चिल्ड्रन व ट्रॅफिक पार्क

६. पोखरण नं. २ वर १.५ एकर सुविधा भूखंडावर Community Park
७. पारसिक सेक्टर ८, पार्क ४ मध्ये Observatory Park कोपरी बारा बंगला येथे एन्जल्स पॅराडाईज पार्क

**२. महापालिका निधीतून प्रस्तावित कामे**

१. वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत आप्पासाहेब पवार उदयानात बॉलीवुड पार्क
२. मौजे-चितळसर मानपाडा घोडबंदर रोड पार्क जुने ठाणे शहराची प्रतिकृती संकल्पनेवर आधारित थीम पार्क

**३. ५ लक्ष वृक्ष लागवड**

या योजनेंतर्गत द्वितीय वर्षामध्ये प्रायोजकांमार्फत व महापालिकेमार्फत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे.

**४. खाडी किनारी मॅनग्रोव्हची लागवड**

महापालिका क्षेत्राला लाभलेल्या खाडी किनारी मॅनग्रोव्हची लागवड करण्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.३० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

## (८) अग्निशमन सेवा

### सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

**१. टर्न टेबल लॅडर व क्वीक रिस्पॉन्स वाहन खरेदी**

महानगरपालिका हद्दीत मोठया प्रमाणात उंच इमारती व मॉलचे बांधकाम सुरु असल्याने अग्निशमन विभागाचे बळकटीकरण करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात ६८ मीटर उंचीचे एक टर्न टेबल लॅडर, ६ क्वीक रिस्पॉन्स वाहन खरेदी करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

### २. अग्निशमन केंद्र बांधणे

महापालिका क्षेत्रातील मुंब्रा व वागळे येथे अग्निशमन केंद्राचे पुर्ननिमाण करण्याचे नियोजित असून त्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## (९) विद्युत विभाग

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

### १. रस्त्यावरील दिवाबत्ती

महापालिकेच्या पथदीपांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता व पर्यावरणभिमुख तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टिने पारंपारिक सोडियम व्हेपर दिव्यांच्या ऐवजी LED तंत्रज्ञानाचा वापर करुन करण्यात आलेला आहे. चालू आर्थिक वर्षापर्यंत ८९०५ LED पथदीप लावण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. बदलण्यात आलेल्या LED पथदीपांच्या वीज देयकात ५० ते ६०% वीजबचत होत आहे.

### २. वाहतूक सिग्नल यंत्रणा

महापालिका क्षेत्राअंतर्गत वाहतुकीच्या सुलभेतसाठी शहर वाहतूक विभागाच्या सूचनेनुसार २ नवीन ट्रॅफिक सिग्नल बसविण्यात आले आहेत. त्याच बरोबर घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक नियंत्रकांचे Synchronisation करण्यात येत आहे. त्यामुळे वाहनचालकास सिग्नलवर थांबण्याचा वेळ कमी झाला आहे. तसेच कापुरबावडी येथे कालशेत जंक्शन, ग्लॅडी अल्वारिस रोड वर हीरानंदानी मिडोज चौक व तुळशीधाम चौक या तीन चौकात नवीन ट्रॅफिक सिग्नल बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून ते चालू आर्थिक वर्षात पूर्ण होईल.

### ३. चौकामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने पूर्वद्रुतगती मार्गावरील आनदंनगर, तीनहात नाका, नितीन जंक्शन व कॅडबरी जंक्शन या चार चौकात CCTV कॅमेरे व wi-fi Connectivity सह लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

### ४. सौर शहर विकास प्रकल्प

केंद्र शासनाने ठाणे शहराची सौर शहर म्हणून निवड केलेली आहे त्या अंतर्गत ठामपाच्या विविध इमारतींवर सौर ऊर्जेवरील १३६ किलो वॅट क्षमतेची वीज निर्माण करणारी यंत्रणेचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्या अंतर्गत महापालिकेची ३ प्रभाग कार्यालये व ४ आरोग्य केंद्र हे Net Zero म्हणजेच उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा गाठण्यात आलेला आहे.

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

### १. ESCO संकल्पनेच्या माध्यमातून LED पथदिवे

ऊर्जा कार्यक्षमतेसाठी ESCO संकल्पनेच्या माध्यमातून LED पथदिवे महानगरपालिकेच्या महसुली व भांडवली खर्च न करता सोडीयम व्हेपर ऐवजी १२,००० ऊर्जा कार्यक्षम LED दिवे बसविण्यात येणार असून त्यामुळे रस्त्यावरील दिवाबत्तीचा वीजभार ७ मेगावॅट वरुन २ मेगावॅट होणार आहे.

### २. इलेक्ट्रीक बसेस पुरवठा व संचलन

नागरिकांना वाहतुक सुविधा देण्याच्या दृष्टीने पर्यावरणाभिमुख १०० प्युअर इलेक्ट्रीक बसेस पुरवठा व संचलन करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात आली असून लवकरच त्यांचे कार्यान्वयन करण्यात येईल.

### ३. सौर उर्जेवर वीज निर्मिती

महापालिकेच्या टेमघर जलशुध्दीकरण संयत्र, कोपरी येथील मल प्रक्रिया केंद्र, महानगरपालिका इमारतीवर १० मेगावॅटचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यातून प्रति मेगावॅट १६ लक्ष वीज युनिट प्रमाणे वार्षिक एकूण १६० लक्ष वीज युनिट उत्पादन अपेक्षीत आहे.

महानगरपालिकेच्या पाणी वितरण यंत्रणेवर ६० किलोवॅट क्षमतेचे लघु व सूक्ष्म जल विद्युत प्रकल्प उभारणीअंतर्गत संपूर्ण महसुली व भांडवली खर्च ठेकेदार करणार असून महापालिकेस कमी दरात अपारंपारिक स्त्रोतातून वीज उपलब्ध करुन देणार आहे.

## (१०) प्रदूषण नियंत्रण कक्ष

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

### १. Continuous Ambient Air Quality Monitoring Station

- ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता नियमितपणे तपासण्याकरिता प्रदूषण नियंत्रण कक्षाद्वारे तीन हात नाका येथे Continuous Ambient Air Quality Monitoring Station उभारण्यात आलेले आहे.सदर सर्वेक्षण केंद्रावर २४ X ७ शहरातील चौकाच्या ठिकाणची हवेची गुणवत्ता दर्शविण्यात येत असून, सदर माहिती नागरिकांना Online उपलब्ध असणार आहे.

### २. राज्य तलाव संवर्धन योजने अंतर्गत ठाणे शहरातील तलावांचे संवर्धन करणेबाबत

- राज्य तलाव संवर्धन योजने अंतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीतील कावेसर व मासुंदा तलावांच्या संवर्धनाकरिता निधी मंजूर झालेला आहे.

# सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

## १. स्व. प्रमोद महाजन निसर्ग उद्यान, मुल्ला बाग येथे Butterfly Park ची उभारणी.

या ठिकाणी Butterfly Park तयार करण्याचे प्रस्तावित असून सदर उद्यानात लोकांना Information Center तयार करण्यात येईल ज्यामध्ये फुलपाखरांची माहिती, Slideshow प्रदर्शित करण्यात येईल.

## २. " पक्षीतीर्थ " Artificial Nesting and Feeding Ground ची संकल्पना राबविणे.

ठाणे शहरामध्ये वाढत्या शहरीकरणामुळे लहान पक्षांची संख्या कमी होत आहे. आजकाल उंच इमारतींमुळे पक्षांना घरटी बांधण्याकरिता आडोसा मिळत नाही. यासाठी महानगरपालिकेच्या ४ उद्यानांमध्ये " पक्षीतीर्थ " Arificial Nesting and Feeding Ground संकल्पना राबविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पामध्ये विविध प्रकारची Artificial Nests (Wooden Nest Boxes) झाडांवर लावण्यात येतील व त्यांचे संवर्धन व संरक्षण करण्यात येईल.

## ३. ग्रीन बिल्डींगचे ऑडीटींग करणे.

ठाणे महानगरपालिकेने सौर यंत्रणा व रेन वॉटर हार्वेस्टींग करणाऱ्या गृहसंकुले व आस्थापनांना मोठ्या प्रमाणात करामध्ये सवलत दिलेली असून सदर यंत्रणा बरोबर सुरु आहे की नाही याची तपासणी करण्याची गरज आहे. त्याची कार्यवाही सन २०१६-१७ मध्ये करण्यात येणार आहे.

## ४. Dry Waste Collection Center (DWCC) स्थापन करणे.

महापालिकेने ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे काम सुरु केलेले असून सोसायटींमधील सदर सुका कचरा संकलन करणे यासाठी प्रभाग समिती निहाय DWCC स्थापन करण्यात येणार असून महिला कचरा वेचकांच्या मदतीने स्त्री मुक्ती संघटना सोसायटीमध्ये जाऊन जनजागृती करुन सुका कचरा गोळा करुन वर्गीकरण करुन दुस-या संस्थेला विकणार आहे. यामुळे महापालिकेचा कचरा वाहण्याचा भार काही अंशी कमी होईल.

# (११) माहिती व तंत्रज्ञान

माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासनाच्या कार्यपध्दतीमध्ये पारदर्शकता व परिवर्तन आणण्याच्या दृष्टीने ई-गव्हर्नसचे महत्व पाहता अशा प्रकारच्या उपक्रमांना प्राधान्य देण्यात आलेले असुन त्याचाच एक भाग म्हणून ठाणे महानगरपालिकेतील संगणक विभागाचे माहिती तंत्रज्ञान कक्षात रुपांतर करण्यात आलेले आहे.

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प व योजना

१. ई-गव्हर्नस
२. जुन्या कागदपत्रांचे स्कॅनिंग करणे
३. स्टार ग्रेड (तक्रार व्यवस्थापान प्रणाली ) प्रणाली अमलात आणणे
४. टी.एम.टी इंटीग्रेटेड ट्रासपोर्ट सिस्टीम (ITS) व कमांड कट्रोल सेंटर (CCC)
५. लेखा विभागातील Tally प्रणाली मध्ये कामाच्या गरजेनुसार बदल करणे
६. स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज व वॉटर सप्लाय विभागातील ना हरकत दाखला देणेसाठी प्रणाली तयार करणे
७. संगणक व इतर हार्डवेअर खरेदी

## सन २०१६-१७ चे प्रस्तावित प्रकल्प

**१. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे संगणकीकरण** रुग्णालयातील १२ विभागांचे संगणकीकरण करुन बाहय रुग्ण विभागातील कामकाजाचे संपूर्ण ऑटोमेशन करणे प्रस्तावित आहे. सदरचा प्रकल्प हा ५ वर्षांसाठी BOOT (Build , Own Operate & Transfer) या संकल्पनेवर आधारित असेल.

**२. एम - गव्हर्नस :-** ई-गव्हर्न्सच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर पुढचे पाऊल म्हणजेच एम - गव्हर्नस या अंतर्गत महानगरपालिकेच्या सर्व ऑनलाईन सुविधा मोबाईल वर (ॲप द्वारे) देण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या कार्यालयात न येता बरीच कामे घरबसल्या मोबाईल द्वारे करता येतील.

**३.** सेवा हक्क कायदयांतर्गत (RTS) १६ सेवांची नागरिकांना ऑनलाईन उपलब्धता व्हावी यासाठी नागरी सुविधा केंद्राचे आधुनिकीकरण

## (१२) परिवहन सेवा

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ठाणे परिवहन सेवेसाठी मुल्ला बाग बस डेपो विकासासाठी रु. २.८० कोटी वओवळा बस डेपो विकसित करण्यासाठी रु. ९.२५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

परिवहन सेवेस अनुदान म्हणून रु. ४५ कोटी व परिवहन संचलन तूट भरुन काढण्यासाठी रु.२५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

## (१३) प्रशासकीय कामकाजात सुधारणा

१. कार्यालय व्यवस्थापन पध्दतीमध्ये गुणात्मक सुधारणा

२. अधिकारी कर्मचा-यांच्या प्रशिक्षणासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.३० लक्ष** तरतूद करण्यात आलेली आहे.

३. कार्यालयीन कामकाज पध्दतीमध्ये Ease of Doing Business चा वापर करण्यात येत आहे.

४. कार्यालयातील नस्त्यांचे संनियंत्रण करणेसाठी डॉक्युमेंट जर्नी मॉनिटरींग सिस्टिम अंमलात आणण्याचे नियोजन आहे.

५. Iris Authentication स्कॅनर मशिनद्वारे कर्मचा-यांची उपस्थिती नोंदणी करुन त्यानुसार वेतन प्रदानाची कार्यवाही करण्यांत येणार आहे.

६. NIC मार्फत ई- टेंडरींग प्रणाली राबविण्यात येणार आहे.

७. लेखा विभागामार्फत सर्व कंत्राटदारांचे प्रदान ECS प्रणालीद्वारे सुरु करण्यात आले आहे.

८. सर्व विकास कामांचे Geo Tagging करुन प्रस्ताव तयार करण्याचे नियोजन आहे.

९. शहर विकास विभागामध्ये छाननी कक्ष स्थापन करुन विकासकांचे प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

१०. महानगरपालिकेची धोरणे व विकास कामांची माहिती सर्व नागरिकांपर्यंत सकारात्मकरित्या पोहचण्यासाठी तज्ञ जाहिरात एजन्सी नेमण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात **रु.२५ लक्ष** तरतूद करण्यात आलेली आहे.

११. ठाणे शहरातील तरुणांना केंद्र व राज्य प्रशासकीय सेवेच्या स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी आवश्यक पुस्तके उपलब्ध करुन देण्याकरीता चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थां येथे पुस्तके खरेदी व ई- लायब्ररी सुरु करण्याचे नियोजन असून त्याकरीता **रु.१४ लक्ष** तरतूद करण्यात आलेली आहे.

# (१४) समाज विकास विभाग

## १. महिला व बाल कल्याण कार्यक्रम

महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ ते २०१८-१९ या पाच आर्थिक वर्षासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्यांत आल्या होत्या. त्यातील काही योजना कमी करुन व काही नवीन योजनांचा समावेश करुन नव्याने धोरण निश्चित केले आहे. नव्याने समाविष्ट केलेल्या योजना पुढील प्रमाणे आहेत.

१. वर्तकनगर येथील बाल स्नेहालयासाठी आर्थिक तरतूद
२. महिलांच्या वैयक्तिक स्वच्छतेसाठी सॅनिटरी व्हेंडींग मशीन
३. रिक्षा चालक महिलांकरिता प्रसाधनगृह
४. महापालिका व शासकीय कार्यालयामध्ये बचतगटामार्फत उपहारगृह चालविणे
५. शहीद झालेल्या सशस्त्र जवानांच्या वीर पत्नीस २५ हजार आर्थिक मदत

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

## २. नि:समर्थ कल्याणकारी योजना

नि:समर्थ व्यक्तींच्या कल्याणकारी योजनांसाठी सन २०१४-१५ ते २०१८-१९ या पाच आर्थिक वर्षासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्यांत आल्या होत्या. त्यातील काही योजना कमी करुन व काही नवीन योजनांचा समावेश करुन नव्याने धोरण निश्चित केले आहे. नव्याने समाविष्ट केलेल्या योजना पुढील प्रमाणे आहेत.

१. सार्वजनिक वाचनालयांमध्ये अंध व्यक्तिंकरीता ऑडीओ लायब्ररी तयार करणे
२. उत्पन्नाच्या अटीवर घरकुलासाठी ठाणे महापालिकेतर्फे रु.२५,००० अर्थसहाय्य

३. शॉपिंग मॉल, मंडया इत्यादीमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्याकरिता अर्थसहाय्य

४. रात्र निवारा केंद्रांमध्ये अपंगांकरिता विशेष सुविधा निर्माण करणे.

५. बेटी बचाओ योजनेअंतर्गत एका मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या अपंग कुटूंबास अर्थसहाय्य

६. ६० वर्षावरील अपंगांना पेन्शन योजना

७. अपंग बेरोजगारांना भत्ता देणे

८. अपंगांना विविध व्यावसायाचे प्रशिक्षण देणे

अपंगांसाठी कल्याणकारी योजनेंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी **रु.८.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## (१५) सर्व्हिलन्स व सुरक्षा

### १. नागरिकांना मोफत Wi-fi सुविधा

Digital India व स्मार्ट सिटी अंतर्गत ठाणे शहरातील नागरिकांसाठी ५१२ kbps स्पिडपर्यंत मोफत Wi-Fi इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

### २. सीसीटीव्ही सर्व्हिलन्स

ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या व वाढती वाहतूक पहाता शहराच्या सुरक्षिततेसाठी शहरातील चौकांमध्ये व इतर ठिकाणी प्रभाग सुधारणा निधीमधून व महापालिका निधीतून सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे व कंट्रोल रुम बांधण्यासाठी सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पात **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच प्रायोजकामार्फतही महापालिका हद्दीमधील विविध ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे नियोजन आहे.

## आभार

भारताचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, अमृत, स्मार्ट सिटी, सर्वांसाठी घरे , सोलार सिटी, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना आणि अन्य योजनांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्याबद्दल त्याचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मा.उपसभापती विधान परिषद, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे मा.आयुक्त, नगर विकास विभागाचे मा.सचिव व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना प्रोत्साहीत करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते, सर्व सन्मा. नगरसेवक व सर्व पक्षांचे मा.लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे शहरातील सर्व वृत्तपत्र व वृत्तवाहिन्या यांचे पत्रकार, प्रतिनिधी यांनी महापालिकेच्या विविध योजनांना, धोरणांना सातत्याने सकारात्मक प्रसिध्दी देऊन सहकार्य केले त्याबद्दल विशेष आभारी आहे.

महानगरपालिकेच्या सर्व कामांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभागी असलेले महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील चव्हाण, श्री. अशोककुमार रणखांब व विविध विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अहोरात्र काम करुन तयार केल्याबद्दल मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सुधीर नाकाडी, शहर

विकास व नियोजन अधिकारी श्री. प्रमोद निंबाळकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. रुपेश पाडगावकर, लेखा विभागाच्या अर्थसंकल्पाचे काम करणा-या सौ.अर्चना निपुर्ते व लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेही आभार मानतो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस शिफारस करणेसाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

**धन्यवाद ! जय हिंद !!**

**संजीव जयस्वाल**
**महापालिका आयुक्त**